

# True Love

डॉ. वसुधा विनोद देव

# TRUE LOVE

ISBN - 30-978-93-84801-12-0

http//:www./chinmayasanskar.com
ह्या पुस्तकातील मुळ लेखांचा स्त्रोत
http//:www./facebook.com/sadaphuli/

(ISBN : 978-93-84801-12-0)

**सुनंदा प्रकाशन क्रं. ३०, ता. २१ मे २०१८**

# TRUE LOVE

**ल्लेखक :**

डॉ. वसुधा विनोद देव, ०९४२२९५९७६४

३ चिन्मय, शंकर नगर,

घाटोळ लेआउट, जठारपेठ, अकोला. ४४४००५

श्री. विनोद दत्तात्रय देव ०९४२२९५९७६३

(सर्व हक्क सुरक्षित)

**प्रकाशक :**

श्री. मनीष शांताराम बुटे

सुनंदा प्रकाशन

राजेश्वर अपार्टमेंट, जलाराम शाळेजवळ,

तापडिया नगर, अकोला.

दूरध्वनी :- ०७२४-२४२१२९९

भ्रमनध्वनी :- ०९४२२९२०२२५

**आवृत्ती पहिली : दि. २१ मे २०१८**

**अक्षर रचना :**

संजय आर. अन्नदाते

चिराग ग्राफीक्स, जठारपेठ,अकोला.

९८५०६४७९९२

**मुद्रण :**

अश्विनी प्रिंटर्स, दत्त मंदिर समोर,

रामदासपेठ,अकोला. ९८२३१०९१९३


**मुल्य :**

रु. ७५/-

# समर्पित



# आमच्या चिन्मय प्रेमास अर्पण



# चिन्मय सदाफुली
# (डॉ. वसुधा विनोद देव)

सहयोगी प्राध्यापक व

समन्वयक स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्र ,

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

अध्यापनाचा अनुभव –२८ वर्ष

शिक्षण:– M.COM, M.A. (MARATHI,ECONOMICS,SUBJECT COMMUNICATION), M.ED. PhD.

प्रकाशन;–

१.एकूण ७ पुस्तके प्रकाशित
२.एका पुस्तकाला उत्कृष्ट पुस्तक पुरस्कार
३.दोन पुस्तके शासनमान्य
४.एका पुस्तकाचा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश
५.एकूण २०० लेख प्रकाशित
६.जागतिक आंतरराष्ट्रीय राज्यस्तरीय चर्चा सत्रात सक्रिय सहभाग
७.२०१४ मध्ये अथेन्स ग्रीस येथे जागतिक तत्वज्ञान परिषदेत "SWAMI CHINMAYANAND ON RELIGION" ह्या विषयावर व्याख्यानाला आमंत्रित
८. हा जागतिक स्तरावरील पहिला प्रबंध मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून
९.विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत शासकीय अध्यापक महाविद्यालयात स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्राची स्थापना
१०.स्वत: ची वेबसाईट www.chinmaysanskar.com
११.चिन्मय मिशन ची सक्रिय कायकर्ती
१२.संतगाडगेबाबाअमरावती विद्यापीठ अमरावती येथे Ph.D ची मार्गदर्शक एकूण ५ विद्यार्थ्यांना Ph.D प्राप्त

# मनोगत

प्रेम हा विषय आपल्या खूप जिव्हाळ्याचा आहे,,प्रेम म्हणजे जीवन,प्रेम म्हणजे सर्वस्व,,,आणि प्रेम हा शब्द आला की आपण मौन होतो,,,सर्व साहित्यिकांना भुरळ पडणारा शब्द,म्हणजे प्रेम,,कवींच्या कवितेचा विषय प्रेम,,माणसाला माणूस म्हणून जगायला शिकविते ते प्रेम,,मानवाची सर्वोच्च भावना प्रेम,,जगाला जिंकण्याचे सामर्थ्य ज्यात आहे ते प्रेम,,बाळाचा पहिला हुंकार म्हणजे प्रेम,जगाशी नाते जोडणारी पहिली भावना प्रेम,,तारुण्याचा बहार म्हणजे प्रेम,वृद्धत्वाची सावली म्हणजे प्रेम,आंधळे व्यक्तीचे डोळे ,अपंगांचे पाय म्हणजे प्रेम,दुःखाच्या वाळवंटातील एक हलका उसासा म्हणजे प्रेम,,भरभरून बोलावे असा एकच शब्द प्रेम,,म्हाकाव्याही ज्याचे गुणगान करताना थकणार नाही असा शब्द म्हणजे प्रेम,,प्रेम असते आईच्या मायेत वडिलांच्या छायेत,,मित्र मैत्रिणींच्या सहवासात,,प्रियकर प्रेयसीच्या गुंजनात,,प्रेम आहे बहिणीच्या भावाच्या निःस्वार्थ नात्यात,,प्रेम आहे राष्ट्रप्रति समर्पणात,,प्रेम आहे संस्कृतीत ,प्रेम आहे साहित्यात,तत्वज्ञानात,,,,आणि हो प्रेम आहे चराचरात,,,

ह्या प्रेमाची अभिव्यक्ती जर तेवढीच उदात्त झाली तर जीवनात आनंद येतो,,पण बऱ्याचदा आपण पाहतो की आज ह्याची अभिव्यक्ती अतिशय वेगळ्या पद्धतीने होते आणि ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे प्रेमात आलेला स्वार्थ,,,आणि अहं मम ची भावना,,प्रेमातील मालकी हक्काची भावना,,आणि ह्या भावना म्हणजे प्रेम भावनेतील भेसळ होय,,प्रेम भावना विशुद्ध करायची असेल तर ह्यातील भेसळ तर दूर करावी लागेलच पण शिवाय भविष्यात भेसळ होणार नाही ह्याची खबरदारी,,,आणि ह्यासाठी खरे प्रेम म्हणजे काय?? प्रेमाची पराकाष्ठा म्हणजे काय??प्रेमाची उच्चतर सीमा कोणती??उदात्त प्रेम म्हणजे काय? अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक असते,,,

प पू गुरुदेव स्वामी चिन्मयानंद ह्याचा I LOVE YOU ह्या पत्रधाराच्या आधारित पुस्तकावर माझ्या विद्यार्थ्यांकरिता स्वामी चिन्मयानंद अभ्यास केंद्रात अभ्यास वर्गाचे आयोजन केले होते,,जवळपास पंधरा दिवस झालेल्या ह्या अभ्यास वर्गाचे खूप छान अनुभव होते,,हे सर्व शब्द बद्ध करावे ही माझ्या विद्यार्थ्यांची ईच्छा,,, आणि म्हणून TRUE LOVE चे प्रयोजन,,,

हे सर्व विचार मी प पू गुरुदेव स्वामी चिन्मयानंद ह्यांचे चरणी अर्पण करते,,,

**❊चिन्मय सदाफुली❊**
**(डॉ. वसुधा विनोद देव,)**
**सहयोगी प्राध्यापक ,**
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

# TRUE LOVE PART 1

आमच्या बद्दल तुम्हास बोलायला सांगितले तर अगदी दोन तीन शब्दात आपण काय बोलाल ? विद्यार्थ्यांचाप्रश्न.मी क्षणाचाही विलंब न लावता म्हटले I LOVE YOU हे माझे वाक्य ऐकलेआणिविद्यार्थी स्तब्ध झाले. रोहित हिवरकर नावाचा माझा विद्यार्थीअतिशय संवेदनशील,पणविचारांनीपरिपक्व. त्यानेमला मेसेज पाठविला कि आज प्रेमाचे किती बीभत्स स्वरूपबघायलामिळत. प्रेम हि संकल्पनाच आज बदनाम झाली त्यामुळे माझा प्रेम ह्या शब्दवरचा विश्वासच उडाला आहे. त्याचे हे शब्द ऐकून मी खूप अस्वस्थ झाले,प्रेम ह्या शब्दवरचा विश्वास उडणे म्हणजे जिवंतपणी मरण यातना भोगण्या इतके ते वेदनादायी आहे, पण त्याचा विश्वास उडण्यासाठी समाजातील अवतीभोवती असणारी परिस्थिती कारणीभूत आहे.

प्रेम हा शब्द उच्चारला कि फक्त शरीर प्रेम त्याच्या विविध पायऱ्या आणि त्यानंतर प्रेमालाही लाज वाटेल असे होणारे त्याचे बीभत्स रूप,प्रेमाचे हे रूप अत्यंत वेदनादायी व विश्वास उडवणारे आहे. मी पणखूप अस्वस्थ झाले कारण प्रेम ह्या शब्दवरील विश्वास उदावणाऱ्या घटना माझ्या आजूबाजूला खरंच घडतात आहे. आता रोहित ला आणि त्याच्या सहकार्यांना कसे समजावून सांगावे. मला खूप प्रश्न पडला. पण विद्यार्थ्यांने मार्ग हवे असतात. मला एकदम मी वाचलेल्या एका सुंदरपुस्तकाची आठवण झाली. नव्हे त्या पुस्तकाने कितीतरी युवकांचे भावविश्व समृद्ध केलेआहे. अगदीमाझेही. सर्वांवर प्रेम करायला शिकवले त्या विचारांनी. आणि अगदी नि:स्वार्थ. ते पुस्तक

आहे प पू स्वामी चिन्मयनानंद ह्यांचे. पुस्तकाचे नावच I LOVE YOU. आणि ह्या विचारांचे संस्कार मनावर पक्के आहेत. आणि म्हणूनच विद्यार्थ्यांनी तीन शब्द आमच्या साठी उच्चारा म्हटल्यावर माझ्या नकळत हे शब्द निघाले. पणआता गुरुदेवांच्या विचार विद्यार्थ्या पर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी माझ्यावर होती पण एकाच बैठकीत ते शक्य नव्हते,पण आमची पूर्णसंकल्पना समजून घेण्याची तयारी आहे,हे त्यांनी सांगितले आणि प्रेम ह्याच विषयावरआताकाही समजावून सांगणे गरजेचे होते. पण आज मी त्यांना सांगितले की प्रेम हा सर्व धर्मांचागाभा आहे. प्रेम करा हीच शिकवण प्रत्येक धर्माने दिली आहे. आपल्याला प्रेम करता यायलाच हवं.

सर्वांवर प्रेम करणे ही खऱ्या अर्थाने परमेश्वराची सेवा आहे. आपण ईश्वरावर प्रेम करतो,आपल्याला निर्व्याज प्रेम करता यायला हवे. जगाला जिंकायचं असेल तर ते फक्त प्रेमानेच जिंकता येत. संपूर्ण जगावर मला प्रेम करता आले पाहिजे. प्रेम हि खरंच एक कला आहे,हि कला मला अवगत व्हायलाच हवी. पण ती कशी होणार?हा प्रश्नहि कला शिकावी लागते का?होय प्राचीन काळापासून अखिल विश्वावर प्रेम कसे करायचे हे ऋषी मुनींनी शिकविले. त्यांच्या शिष्यानी हाच संदेश पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविला. आजही आपण जेव्हाही धर्म ग्रंथ वाचतो त्या सगळ्याचा पाया नि:स्वार्थ प्रेम हाच आहे. हे मी सांगितले पण आता खऱ्या प्रेमाची संकल्पना जाणून घेण्याची उत्सुकता जिज्ञासा विद्यार्थ्यांमध्ये जागृत झालीहोती. कारणहीतसेच होते. प्रेम हा शब्द आला की बोलण्यासारखे काहीच नाही तेथे कृती महत्वाची ठरते. प्रेमाचा आरंभ बिंदू प्रमाची परिसीमा आपल्या

धर्मग्रंथानी आपल्यास शिकवली. पण आपण प्रेम हा शब्दच संकुचित करून टाकला. त्याच्यास्वरूपाबद्दल आपण खरंच अन भिज्ञ आहोत. प्रेमाचे प्रकार आहेत. तेही आपण समजून घ्यायला हवे.

प्रेमाची परिसीमा हि भक्तीत असते. आपल्या मनात प्रेमाबाबत खूप गैरसमज असतात. आपल्यावर कुणीतरी प्रेम करावे हे आपणास कायम वाटते व हे प्रेम निःस्वार्थ असावे असेहि वाटते. आणि जो आपल्यावर निःस्वार्थ प्रेम करतो तो आपल्याला खरंच प्रिय असतो,,पण त्याच वेळी आपण इतरांवर असेच निरपेक्ष प्रेम करतो आहे का हे आपणास तपासून पाहता यायला हवे,,माझ्यावर कुणी प्रेम करीत नाही म्हणून आपण किती दुःखी होतो. पण जे तुमच्यावर प्रेम करीत नाहीत हे तुम्हास माहित आहे तरीही तुम्ही त्यांच्यावर प्रेम करू शकाल ? तुमचा अपमान द्वेष करणाऱ्यांवर तुम्ही प्रेम करू शकाल ? उत्तर मिळाले नाही,मग प्रथम हा प्रयत्न करून पहा. यादी करा आजवर माझाकुणी कुणी अपमान केला. कुणी कुणी द्वेष केला,राग केला. त्यांच्याबद्दल आधी मनात प्रेमाची भावना निर्माण करा आणि मनाला तसे आदेश द्या. आज फक्त हाच सराव करा. विद्यार्थ्यांच्या मनात खूपच उत्सुकता होती,पण प्रथम त्यांच्या मनाची भूमी सुपीक करणे गरजेचे होते. ह्या सारवानंतर आपण उद्या पुन्हा प्रेम ह्या विषयावर चर्चा करू हे आश्वासन मी विद्यार्थ्यांना दिले.

# TRUE LOVE PART 2

प्रेम हा विषय कायम आपल्याला हवाहवासा वाटणारा आहे,,विद्यार्थ्यांना मी दिलेला गृहपाठ मुलांनी पूर्ण केला होता आणि माफ करायला जरी जड गेले तरी जसे जसे आम्ही आमचा राग द्वेष करणार्यांना माफ करीत होतो तास तसा आमच्या मनाला खूप शांत वाटत होते,आणि मला हेच हवे होते,कारण त्यांनी आज निर्धार केला होता की कोणीही माझा राग केला तरी मी मात्र त्यांच्यावर प्रेमाचं कारेनमित्रानो जेव्हा आपण दुसऱ्यावर प्रेम करतो तेव्हाच आपण क्रियाशील होऊ शकतो कारण आपली व्यर्थ विचारात जाणारी क्रियाशीलता मग चांगल्या कामासाठी वापरली जाईल. बर मला एक सांगा तुम्ही इतरांचे प्रेम मिळवण्यासाठी काय प्रयत्न केले आहे ?उत्तर मिळालेप्रेम मिळवण्यासाठी कुणालाही तर थोडं इंप्रेस करावाच लागत. म्हणजे काय. म्हणजे चांगली केशभूषा वेशभूषा संपत्ती चांगले दिसण्याचा प्रयत्न मग त्यासाठी वाट्टेल ते. अरे देवा,एवढेच का. मग तुम्हाला प्रेम मिळत?आणि असे मिळालेले प्रेम किती टिकते?नाही न मॅडम ते टिकत नाही. मग तुम्हालाकायकरावं लागेल?माझा प्रश्न,मित्रानो लक्षात असू द्या काही कायम स्वरूपाच्या गुणाधर्मानाआचारूनच कायम स्वरूपी प्रेम मिळविता येईलप्रेम हि संवेदना मनाला होते. आपले मन जेवढे परिपक्व असेल तेवढे हि प्रेमाची भावना परिपक्व होते. म्हणजेच मी केवळ बाह्य गोष्टीवर प्रेम न करता अंतरंगावर प्रेम करायला हवं. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मी प्रेम कुणावर करतो हे महत्वाचेनसून ते मी कसे करतो ते महत्वाचे आहे.

बहिरंगावरील प्रेम टिकणार नाही पण अंतरंगावर केलेले प्रेम कायम टिकेल मग ही कला नाही?बऱ्याचदा आपण बाह्य रूपावर भाळतो आणि प्रथमदर्शनी प्रेम होत,आणि ह्या प्रेमकडूनआपणास सतत काही मिळावं हि आपली अपेक्षा असतेआणि प्रेमात असे देणे घेणे आले की प्रेमतकलादू बनते. कारण तेथे अभिलाषा हा त्या प्रेमाचा पाया असतो. अगदी संस्कृत मध्ये म्हणतात आत्मनास्तु कामाय सर्वम प्रियं भवति. हाच नियम येथेही लागू होतोम्हणजेच एखादी वस्तू जोपर्यंत फायद्याची तोपर्यंत आपले प्रेम टिकणार. म्हणून प्रेमाचा पाया काय आहे हे खूप महत्वाचे आहे. जेवढा प्रेमाचा पाया उदात्त तेवढे प्रेम उदात्त.

हे सर्व खरे पण मी प्रेमात पडलो असे का म्हटले जाते?विद्यार्थ्यांचा प्रश्न. स्वामी चिन्मयनानंद म्हणतात ' Don't Fall In Love Rise In Love किती मार्मिक सल्ला गुरुदेवांनी दिला आहे. प्रेमात पडण्या पेक्षा प्रेमात पाय घट्ट रोवून उभा राहतो त्याचीच प्रगती होते. पुष्कळदाअसेही घडते कि दोन अनोळखी व्यक्ती अचानक जवळ येतात,त्यांच्यात स्नेहबंधनिर्माणहोतात. प्रेमाचे घट्ट नाते निर्माण होते,ह्या नात्यात आत्मप्रौढी आली किंवा स्वार्थ आला तर हे नातेही गळून पडते.

परस्पर एकरूपतेचा अनुभवच गळून पडतोकारण तेथे स्वार्थाच्यागैरसमाजच्या,अहंकाराच्याभिंती उभ्या राहतात. सुंदर नात्याचा तिथे शेवट होतो. नात्यामध्ये दु:ख निर्माण होते,कारणनात्याचा पाया तकलादू होता. मित्रानो शरीर सुखातून आकर्षणातून निर्माण झालेला प्रेमवरवरपाहता अतिशय आकर्षक आहे


इतके कि आपले आयुष्य बदलून गेले आहे सर्व जग सुंदर वाटायला लागले आहे. साहित्यिक ह्यावर काव्याची राचतील पण त्यापेक्षाही गुणामधून निर्माण झालेला प्रेम अधिक मोहक असत. तेथे सौन्दर्य हा निकषांच नाही,तेथे फक्त सद्गुणांचा निकष असतो आणि हे गुण खूप प्रयत्नाने साध्य होतातव त्यांची जोपासनाही करावी लागते.एकदा का सद्गुणांची प्राप्ती व जोपासना झाली की मग आपण प्रेम देण्यास व घेण्यासही पात्र होतो. म्हणजे आपण कितीही कुरूप असलो आणि आपल्यात चांगले गुण असतील तर लोक आपल्यावर प्रेम करतील ?का नाही?कारण खरे प्रेम हे अंतरंगाचा विचार करते बहिरंगाचा नाही. विचार करा की आपल्याला टाकाऊ प्रेम हवाय कि टिकाऊ?निश्चित पणे कायमस्वरूपी प्रेमाचीच आपल्याला गरज असते हे प्रेम आपल्याला फक्त सतगुणांनी प्राप्त होईल. बऱ्याचदा असेही घडते कि आपण एखाद्यावर जीवापाड प्रेमकरतो त्याला सर्वस्व मानतो,कालांतराने त्याचे प्रेम कमी होते पण माझ्या मनातीलत्यांच्याबद्दलचीप्रेमाची भावनातिळमात्रही कमी होत नाही उलट ती व्यक्ती जेवढे मला दूर लोटण्याचा प्रयत्न करते तेवढे मी अधिक त्यांच्यात गुंतून जाते असे का घडते?लगेच उत्तर मिळाले कारण तुम्ही जे प्रेम केले ते सद्गुणांवर आणि गुण संकल्पना अमूर्त आहेपण समोरील व्यक्तीने मात्र बाह्य घटकावर प्रेम केले,ह्यापासून निश्चित बोध घेता येईल की मला कायम टिकणारे प्रेम हवे असेल तर मी समोरच्या व्यक्तीच्या गुणांवर प्रेम करायला हवे.

टिकाऊ गोष्टीवर प्रेम करायला हवे,रूप रंग दिसणे वेशभूषा केशभूषा इत्यादी बाबी ह्या अत्यंत तकलादू आहेत. ह्या गोष्टी नाहीश्या

झाल्या तर प्रेमही नाहीसे होण्याची शक्यता असते. ह्यातनाकारात्मकताही ही येते आणि मग ह्या प्रेमाचे समाजात होणारी भयानक अभिव्यक्तीहि आपण पाहतो. खऱ्या प्रेमाचे हे रूप किती विलोभनीय आहे. असे प्रेम जर मी सर्वांवर करू शकले तर. आपलेस्वत:चेजीवन सुंदर होईल. त्यासाठी मला इतरांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. पुन्हा विद्यार्थ्यांचा प्रश्न कि मॅडम मग खरे प्रेम म्हणजे काय?इतरांवर प्रेम कसं करायचं ? त्याचा प्रश्न अगदी अचूक होता.

पण त्यांना अद्याप गृहपाठ देणे गरजेचे होतेमग ह्या विद्यार्थ्यांनागृहपाठ दिला की ज्या ज्या व्यक्तीवर तुम्ही प्रेम करता त्याची कारणे तुम्ही लिहून आणा.

कारण ह्यावरच आपले पुढचे सगळे विवेचन अवलंबून आहे. माझे विद्यार्थी हे उद्याचे होणारे शिक्षकआहे. आणि त्यांच्यासमोरजो वयोगट येणार आहे तो पौगंडा वस्थेततला असेल. म्हणून त्याच्यासाठी आणि हो पालकांसाठी पण मला हे विवेचन महत्वाचे वाटले.



# TRUE LOVE PART 3

आपण ज्यांच्यावर प्रेम करतो आहोत ते का ?ह्या प्रश्नांची विविध उत्तरे आलेली होती,,आणि त्यात प्रामुख्याने बहिरंगावरच्या प्रेमाची उदाहरणे जास्त होती. पण ते स्वाभाविक होते. माणूस कितीही बुद्धिवान असला तरी तो प्रेमासाठी काहीही करायला तयार होतो,,इतकाच काय पण जनावरांना सुद्धा प्रेमाचीच गरज असते.आपण प्रेमाचीच सावलीत जीवन जगत असतो मग त्याचे स्वरूप भलेही भिन्न असू देत,पण दुर्दैवाची गोष्ट अशी की आपल्या पैकी फारच थोड्या लोकांच्या वाट्याला नि:स्वार्थ प्रेम येते, माणूस मात्र अशा प्रेमासाठी आयुष्यभर धडपडत राहतो. आपल्याला दुसऱ्याकडूनप्रेम मिळविण्याचीच कायम अपेक्षा करतो आणि अपेक्षा भंगाचे दु:ख त्याच्या पदरी पडते. प्रेमाची अभिव्यक्ती वेगवेगळी असते.

आई चे अपत्यावरील प्रेमास वात्सल्य म्हणतात,

तरुण तरुणी च्या प्रेमास प्रणय म्हणतात

नावरबायकोचे प्रेमास गृहस्थाश्रम प्रेम म्हणतात

नातेवाईकांच्या प्रेमास नातेसंबंध म्हणतात.

देशावरील प्रेमास देश भक्ती म्हणतात

ईश्वरावरील गुरुवारील प्रेमास ईश्वर भक्ती गुरुभक्ती म्हणतात.

ह्या सर्व प्रेमाच्या अभिव्यक्ती आहेत. ह्यातील ईश्वर व गुरु भक्ती सोडली तर विचार करा प्रत्येक प्रेम हे कालांतराने माझ्यापासून दूर जाणार आहे. ह्याचे भान माणसाला असते. जनावरे

फक्तसजातीयप्राण्यावर प्रेम करतात कारण विस्तार पावणारी बुद्धी त्यांच्याजवळ नसतेआणि शिवाय त्यांच्यात मालकी हक्काची भावनाही प्रबळ असते.जेथे मालकी हक्काची भावना येते तेथे आपणास वरवर जरी दृढ प्रेम वाटलं तरी ते प्रेम अत्यंत कमकुवत असते.प्रेम हा मालकी हक्क नाही किंवा मालकी हक्क गाजवून प्रेम मिळविताही येत नाही व मिळाले तर ते टिकताही नाही मग त्याला आजचे जग नकारात्मक प्रेम **“NEGATIVE LOVE"** असेही नाव देते.

पण माझ्या विद्यार्थी मित्रानो प्रेमाला नकारात्मकता नाही माहित.सूर्याला विचारा हॅलो सूर्य देवा अंधार म्हणजे काय?सूर्याचे उत्तर असेल ते काय असत?अंधार म्हणजे काय? अगदी तसाच प्रेमाला नकारात्मकता माहित नाही.प्रेम हे सकारात्मकच असते, त्याचे मूळ रूप अत्यंत विलोभनीयसोज्वळ,पवित्र आहे.हि व्यक्तिगत अनुभूती असली तरी वैश्विक आहे. प्रेम ह्यासंकल्पनेला कृतीला मर्यादा नाही.आकाशासारखे अनंत व अमर्याद सागरासारखे सखोल. पण हे प्रेम मालकी हक्काच्या भावनेवर आधारित नको तसेच ते निर्भय पण हवे. प्रेमाला भय नको. म्हणजे काय?मानवाला तीन प्रकारचे भय असते,पहिले भय असते ते माझ्या भूतकाळात जे घडले त्याचे. असे का घडले ? आणि माझ्याच बाबतीत का घडले?म्हणजेच आयुष्यात घडलेल्या घटनांबाबत पश्चात्ताप. भविष्यात घडणाऱ्या घटनांबाबत औत्सुक्य काय होणार कसे होणारआणि वर्तमानात जे घडतंय त्याबाबत ची भीती किंवा असे का घडतंय हा प्रश्न. पण ह्यावर उपाय काय आणि प्रेमाचा आणि ह्या विवेचनाचा काय संबंध?

विद्यार्थ्यांचा पुन्हा प्रश्नअसं बघा भूतकाळात माझ्या आयुष्यात आलेली व्यक्ती माझे प्रेमास्पद हे माझ्याजवळ राहिले नाहीत असं का

घडलं हे दुःख माणसाचे आयुष्य जीवन पोखरून टाकतो, मन उदास करत,ज्यांना ज्यांना म्हणून मी माझे मानले त्यांनी सर्वांनी माझी साथ सोडली. ह्याचे किती दुःख असते. आज ज्यांना मी आपले मानतो ते भविष्यात माझ्याजवळ राहतील कि नाही ही शाश्वती नाही. त्यांच्या वियोगाचे दुःख मला सतत भेडसावते माझा वर्तमान असह्य करते. आणि वर्तमानात माझ्या मनाप्रमाणे माझे कुणीही प्रेमाचे लोक वागत नाहीत. ह्या सर्व गोष्टींचा मला खूप दुःख होते. माझा वास्तविक पाहता कोणत्याच काळावर नियंत्रण नसतेआणि ह्या सर्व भयावह परिस्थितीत मी कितीतरी प्रेमाची माणसे गमावून बसतो. माझे विद्यार्थी खूपच अंतरमुख झाले होते. हे आपण सर्व जगतो पण ह्याची जाणीव आपल्याला कधीच नसते. जे घडले जे घडते आहे जे घडणार आहे ते माझ्या हाती नाही पण माझ्या हातात माझे मन बुद्धी आहे की जिच्यावर फक्त माझाच अधिकार असावा. पण ह्या भयातूनच मग एकटेपणाची भावना निर्माण होते आपण एकटे आहोत आपल्याला आता कुणीच नाही ही भावना प्रबळ होते. ह्या सर्वांवर उपाय एकाच ते म्हणजे प्रेम.

प्रेमातून निर्माण झालेल्या भयावर प्रेम हाच उपाय. प्रेम हे निर्भय असत कालातीत असते. हे माझ्या मुलांच्या लक्षात आले होते. त्यांच्या चेहऱ्यावर मला आत्मविश्वासाची पुसटशी रेषा बघायला मिळाली.

आता गृहपाठ देण्याची वेळ होती. तुमच्यावर प्रेम करणाऱ्या किंवा तुम्ही ज्या व्यक्तीवर प्रेम करता व्यक्तीबाबत तुमच्या मनात कोणते भय आहे आणि का ?

मुलांच्या चेहऱ्यावर मला गृहपाठ करण्याची उत्सुकता दिसत होती.

# TRUE LOVE PART 4

ज्या व्यक्तीवर आपण मनापासून प्रेम करतो ती व्यक्तीचा वियोग हा कायम आपल्या भयाचा विषय बनतो आणि मग आपल्याला त्याच्या सहवासाची आनंदापेक्षा त्याच्या वियोगाचे दु:ख अधिक वाटते. आणि मग आपल्याला आपण एकटे पडू कि काय हि भीती सतत वाटत राहते. कारण आपण ते प्रेम केवळ प्रत्यक्ष अस्तित्वाच्या स्तरावर घेतले असते.मग ह्यावर उपाय काय ?

विद्यार्थ्यांचाप्रश्न.ह्यावर उपाय म्हणजे प्रेमासपदाशी तादात्म्य. आणि ते हि विचारांच्यास्तरावर.म्हणजे कायत्यांना मी एक उदाहरण दिले. आपण ज्याच्यावर प्रेम करतो ती व्यक्ती कायम आपल्या सोबत असावी असे आपणास वाटते. तिच्या अनुपस्थितीत तिच्या सोबत घालविले क्षण आपणास अस्वस्थ करतात. आणि मग आपल्यात एकटेपणाची भावना निर्माण करतात. बघा आठवून आपल्या लहानपणी आपल्यात अशी एकटेपणाची भावना येत होती का ? नाही कारण आपण आपल्या माता पित्याच्या प्रेमात एकजीव झालो होतो. अगदी मातेच्या गर्भात सुद्धा आपण सुरक्षित होतो कारण आपण तिच्याशी एकरूप झालो होतो. आपले बालपण अत्यंत निर्भय पणे आपण जगलो.

पण जसे जसे आपण मोठे होत गेलो तसे तसे आपली हि एकजीवता कमी होत गेली कारण आपण आपले स्वतंत्र व्यक्तिमत्व व अस्तित्व मानायला लागलो.आपल्या आई वाडीलांसारखे स्वतंत्रअस्तित्व हि भावना ज्या क्षणाला येते त्या क्षणाला मग त्यांच्याशी असणारी माझी एकरूपता कमी होते आणि जसजसा ह्या

एकरूपटेपासून आपण दूर जातो तसा आपला एकटेपणा वाढत जातो. आणि हा एकटेपणा घालविण्यासाठी मग मी समाजात माझ्या भोवतालच्या लोकांशी प्रेमाचे धागे गुंफु लागतो.मग ते समाजातील विविध घटकही असू शकतात.आपले मित्र इतर नातेवाईक इत्यादी.

म्हणजे मॅडम तुम्हाला असं म्हणायचं आहे का कि प्रेमाची एकजीवता सोडली म्हणून हा शोध प्रवास सुरु झाला?पण मग आपल्या अस्तित्वाला अर्थ आहे की नाही ?विद्यार्थ्यांचा प्रश्न अगदी बरोबर होता. मित्रानो आपण जेव्हा आपले स्वतंत्र अस्तित्व मानतो तेव्हाच आपण एका नात्याची एकजीवता सोडतो हा नैसर्गिक नियम आहे. पण मग त्यातून निर्माण होणारा एकटेपणाघालवण्यासाठीआपण मग इतर नात्यामध्ये हि एकरूपता शोधतो. बरोबर आहे?आणि ह्या शोधलेल्यानात्यामध्ये आपण आपला एकटेपणा घालविण्याचा विसरण्याचा केविलवाणा प्रयत्न करतो. ह्या प्रयत्नाचे फळ म्हणजे एक नवीन नाते त्या ठिकाणी निर्माण होते.खूप उत्साह असतो ह्या नवीन नात्यात. अगदी लहानमुलाच्या मनात नवीन खेळण्याबाबत उत्साह असतो न तसाच.ह्या नात्यात अनेक आनंदाचेसुखाचे क्षण आपल्याला हाती लागतात. पण तेही फार काळ टिकणारे नसतात. एक क्षण असा येतो की हे मित्र नातेवाईक आपल्यापासून दूर जातात आणि आपला पुन्हा एक नवीन शोध सुरु होतो. हि केविलवाणी मालिका बहुतांशी लोकांच्या वाट्याला येते. आणि मग माणूस पुन्हा एकटेपणाची गर्तेत जातो,एकटेपणा घालविण्यासाठी अनेक उत्सव समारंभ अनेक वाटा शोधतो पण तरीही मनातील एकटेपणाची अपराधी पणाची भावना त्याची जात नाही कारण हे उत्सव समारंभ आपणास परिपूर्ण आनंद देत नाही त्यातील राहिलेल्या उणीव आपल्या

मनात अपराधी पणाची भावना निर्माण करतात. पण ह्याचा आणि प्रेमाचा काय संबंध?संबंध असा की मी कितीही माझ्या मित्रांशीवाईकांशी समाजाशी राष्ट्रांशी नाते जोडत असलो तरी त्या ठिकाणीएकजीवत्वनसते,प्रत्येक ठिकाणी मी माझे स्वतंत्र अस्तित्वच घेऊन वावरत असतो. आणि जो पर्यंत मी माझे स्वतंत्र व्यक्तिमत्व मानतो तो पर्यंत मला स्वतंत्र अस्तित्व आहे असे मी मानतो आणि माझ्या नकळत मी सर्वांपासून एकटा पडतो, आणि शोधाचे दुष्टचक्र सुरूच राहते, कारण मग आपण जास्त अहंकारकेंद्री होतो. आणि समाजात ह्या अहंकाराला धक्का पोहोचला तर मग असे व्यक्ती वेगळा मार्ग अवलंबितात, आपण भौतीक दृष्ट्या कितीही प्रगत असलो तरी आपण पोखरले गेले आहोत. म्हणजे मॅडम तुम्हाला असं म्हणायचं आहे का कि खऱ्या प्रेमात एकरूपता एकजीवता हवी?होय अगदी बरोबर,माझ्या प्रेम भावनेत एकरूपता हवी. माझ्या अहंकाराचा विलय मी माझ्या प्रेमासपदातकरायला हवा. आपण जेव्हा प्रेमाचे नाते जोडतो त्यात आपण एकरूप व्हायला हवे. आपले अस्तित्व त्या प्रेमासाठी विसरायला हवे. प्रेमातच आपले अस्तित्व मिसळून टाकायला हवे. तेथे तू मी हा दुजा भावच नको. तेथे अद्वैत हवं. विद्यार्थी खूपच शांत बसली होती, आणि गृहपाठाची वाट बघत होती. माझा आजचा गृहपाठ होता की तुमच्या आयुष्यातील असे एखादे प्रेमाचे नाते लिहा ज्यांच्या साठी तुम्ही तुमचा अहंकार विसरून त्या नात्याशी एकरूप झालेले आहेत. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आत्मविश्वास मला बघायला मिळाला,प्रेमात एकरूपता हवी हा सिद्धांत त्यांना पटला होत.

# TRUE LOVE PART 5

प्रेम हे सद्गुणांवर करावे,प्रेमाला भय माहित नाही,प्रेमामध्ये एकरूपता एकजीवता हवी हे सर्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आले पण एकरूपतेची अनुभूती येईल असे एकही नाते त्यांच्या यादीत नव्हते.

मॅडम आपण किती स्वतंत्र समजतो स्वत:ला. आमच्या जीवनात एकही नाते असे नाही ज्याच्याशी आम्ही एकरूप झालो.आमचं काही चुकतंय का?

हो कुठेतरी तर चुकतंय. आपलं नेमकं हे चुकत कि आपण कुणावर निर्व्याज प्रेमाचं करीत नाही. आपल्याला जेव्हा एखाद्या वेळी कुणाच्या उदात्त प्रेमाची अनुभूती येते तेव्हा आपल्याला फक्त आनंदाच्या उर्मी जाणवतात, पण आपण मात्र कुणावर उदात्त प्रेम का करू शकत नाही, जेव्हा आपण कुणाशी उदात्त नि:स्वार्थ प्रेमाचे नाते जोडतो तेव्हा आपल्याला एक प्रकारच्या शांतीचा अनुभव येतो कारण समोरच्या व्यक्तीला आपल्याबद्दल काहीही दृष्टिकोन असू दे पण माझ्याकडून मी फक्त प्रेमाचीच प्रवाह त्यांच्यापर्यंत पाठविला आहे. आपले उदात्त प्रेम समजण्याची कुवत समोरच्या व्यक्तीत हवी हि अपेक्षा करू नका, तुमच्याकडून त्याच्या पर्यंत फक्त आणि फक्त प्रेमाचीच प्रवाह जाऊ द्या,

पण मॅडम हे कसे शक्य आहे?का नाही?ज्या ठिकाणी प्रेम आहे तेथे हे सहज शक्य आहे. पण प्रत्येक प्रेमाच्या प्रकारात हे कसे शक्य आहे?

मग आमचे प्रेम कमी दर्जाचे आहे का?मित्रानो प्रेम हे कनिष्ठ किंवा स्रेष्ठ नसत, पण आपण त्याला दोन विभागात जर विभागले तर,

जेवढे उच्च प्रतीचे उदात्त प्रेम असेल जसे आई वडील गुरु देश ह्याच्या बद्दलचे प्रेम हे उदात्त निर्व्याज असते ते प्रेम ह्या संकल्पनेला प्राप्त होते, पण ज्या ठिकाणी थोडातरी स्वार्थ असेल तेथे आपण आपला स्नेह आहे असे म्हणूया. उच्चतर प्रेमात आवड निवड गुंतलेली नसते. आहे तसे त्याची स्वीकृती असते. पण स्नेहात आपल्या आवडी निवडी गुंतलेल्या असतात. वस्तू व्यक्ती आवडली तिच्याबद्दल आपुलकी वाटण ह्याला स्नेह म्हणतात. आजआवडणारी वस्तू व्यक्ती उद्या नावडीचीही होऊ शकतेपण ह्या स्नेहात जेव्हा उच्चतर भाव येतो तेथेच प्रेम हि संकल्पना जन्म घेते.

म्हणजे आम्ही ज्यांच्या ज्यांच्यावर प्रेम करतो ते प्रेम नसून तो स्नेह आहे असे तुम्हाला म्हणायचे आहे का?विद्यार्थ्यांचा प्रश्न,हे बघा मित्रानो ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्या प्रेमा मुळे आपण उन्नत झालो आहे की स्वार्थी झालो आहोत हे तपासून पहा. जेवढ्या घटकावर आपण प्रेम करतो असे म्हणतो त्यात पावित्र्य उदत्तता आहे का हे तपासून पहा. आणि ज्या ज्या प्रेमाच्याठिकाणी तुम्हाला मनाची शांतता पावित्र्य जाणवते ते ते सगळे प्रेमाचं आहे आणि बाकी स्नेह.

ह्याचा अर्थ आई वडील देश गुरु ह्याच्या वरील प्रेम हे 'प्रेम'ह्या संकल्पनेत येईल आणि इतर सर्व स्नेह असं तर तुम्हाला म्हणायचं नाही?विद्यार्थ्यांचा प्रश्न. अगदी बरोबर. उच्च प्रकारचा स्नेह ह्याला आपण प्रेम म्हणूया. आणि स्नेह म्हणजे ज्यात आवड निवड गुंतली आहे असे प्रेम.स्नेहातदेवाणघेवाण असते तशी प्रेमात राहत नाही, प्रेम काहीही मागत नाही, स्नेहात एकमेकांच्या इच्छातृप्तीची भावना असत पण प्रेम कोणतीही इच्छा करीत नाही. ज्याच्यावर आपला स्नेह असतो त्याच्यावर आपल्या सुखदु:खाचे अवलंबित्व असते. प्रेम सुख

दुःखाच्या पलीकडे असते,स्नेहात आपला आनंद इतरांवर व इतरांचा आनंद आपल्यावर अवलंबून असतो. प्रेम हे स्वतः आनंद स्वरूप आहे प्रेमाला दुःख माहित नाही. स्नेह कायम इतरांचा आधार शोधतो पण प्रेमाचे मात्र तसे नाही. स्नेह जेवढा परावलंबी तेवढेच प्रेम हे स्वावलंबी असते. जन्मभर स्नेह उराशी बाळगून आपण आयुष्यभर परावलंबी जीवन जगतो. आपला आनंद हा कायम दुसऱ्यावर अवलंबून असतो. आपण आपला स्नेह कधी कधी इतका दुबळा करतो की आई वडील गुरु,देश,ह्याच्याकडेही आपण सातत्याने सुख आनंद मागत राहतो. हे अतिशय दुबळा स्नेह आहे असे मला वाटते.

मित्रानो आजच्या आपल्या विवेचनावरून प्रेम आणि स्नेह हा फरक लक्षात आला असेल.

आजचा गृहपाठ असा की तुम्ही ज्यांच्या ज्यांच्या वर प्रेम केले असे तुम्हास वाटते त्या सगळ्यांची यादी तयार करा आणि ते प्रेम आहे की स्नेह ते ठरवा.

हा गृहपाठ देऊन मी वर्गात सुधीर फडके ह्यांचे जग हेबंदिशालाहे गाणे विद्यार्थ्यांना ऐकावयास दिले।.



# TRUE LOVE PART 6

प्रेम आणि स्नेह ह्यातील सीमारेषा समजली कि जीवन खूप सुसह्यहोत, ह्याचे कारण त्यामुळे जगण्यातील आत्मविश्वास वाढतो, कारण मलास्नेहातील परावलंबित्व पेक्षाही प्रेमातील स्वावलंबित्व जास्तआवडते. विद्यार्थ्यांना हे निश्चित पटले होते कारण स्नेहमध्ये आपण सातत्यानेदुसऱ्याच्या आधाराची अपेक्षा ठेवतो, मनात तो स्नेह गामावण्याबाबत कायम भयअसते, आणि मग आपण पलायन स्वीकारतो हे त्यांना गृहपाठातून कळले होते. पणमाणसाला हेही आपलेसे वाटतं. कारण आपण कुणाच्या प्रेमावर अवलंबून आहोतह्याची त्याला जाणीवही नसते, अशा व्यक्तीला साधे जीवन जगण्यासाठी सुद्धाचहा कॉफ़ी इतर पेय ह्यांच्यावर आनंदासाठी अवलंबून राहावे लागते,म्हणजेजेथे अवलंबित्व आहे तेथे प्रेम नसून स्नेह आहे असे जर तुम्हाला म्हणायचेअसेल तर आमचे ईश्वरावरील प्रेमहे प्रेम आहे की स्नेह?हा थोडाविवादास्पद प्रश्न होता, मी विचारलेतुम्ही ईश्वराकडे मदतीचे मागणेमागता का? गुरूकडून तुम्ही आपल्याला आपल्या व्यावहारिक जीवनात मदत झालीपाहिजे हा विचार करता का?विद्यार्थ्यांचे उत्तर होय असे होते,बघाजेव्हा मी ईश्वराकडे काही मागते तेव्हा मी आनंदासाठी त्याच्यावरच अवलंबूनअसते,जणूकाही माझ्या प्रार्थनेनंतर माझ्या आयुष्यात आनंद येणार आहे. बरेआनंद आला तर ठीक आणि दु:ख आले तर आपण लगेच ईश्वरावर सुद्धा गुरूवर सुद्धाआरोप करायला मागेपुढे पाहत नाही. आपण अधिक अस्वस्थ होतो आणि मी देवाचेइतके करूनही

मलाजीवनात अपयश आले असे बेधडक विधान करतो. असेईश्वरावर गुरुवर आपल्या दैनंदिन जीवनाचा भार टाकून जर आपण अवलंबून राहत असूआणि आपली अशांतता अपयश ह्याचे खापर फोडत असू तर ह्याला प्रेम म्हणता येणारनाही पण हे स्नेहाचे मात्र अत्यंत विदारक रूप आहे आहे म्हणावेलागेल.

ह्याचा अर्थ ईश्वराचे स्मरण करायचेच आहे पण ह्यास्मरणामागेकोणताही स्वार्थ नकोअसे तुम्हास म्हणायचे आहे का?

हो अगदी बरोबर. जेथेजेथे म्हणून स्वार्थ येईल ते प्रेम नसून स्नेह आहे हा धडा विद्यार्थ्यांचापक्का झाला. पुष्कळदा आपण ह्या स्नेहात गुलामगिरी पत्करतो. म्हणजेचज्यांच्यावर आपण स्नेह करतो त्या व्यक्तीचे आपण गुलाम आहोत असे आपणसमजतो. स्वत:कडे क्षुद्र पणा घेतो सगळे आरोप प्रत्यारोप आपण स्वत:कडेघेतो आपल्या प्रेमास्पद व्यक्तीला सुरक्षित ठेवण्याबाबत. हा आपला नित्याचाअनुभव आहे. पण अशा प्रकारचा स्नेह हा निष्क्रिय तर आहेच पण हा स्नेहदुसऱ्यावर सत्ता गाजविण्याच्या प्रवृत्तीला जन्म देतो. आपल्यावर स्नेहकरणाऱ्या व्यक्तीवर सत्ता गाजविण्याच्या हि वृत्ती मग निर्माणहोते.

म्हणजे स्नेह कारणाऱ्यांचेही दोन प्रकार आहे असे तुम्हालाम्हणायचे आहे का?

होय अगदी बरोबर. आपणाला असे कितीतरी ठिकाणी बघायलामिळेल कुटुंबामध्ये समाजात इत्यादी ठिकाणी. कि कुणाला कायम कुणाच्या तरीधाकात राहावे लागते,आणि कुणाला कायम इतरांना धाकात ठेवायला आवडते. धाकदाखवतो तो धाकाने माणूस बांधून ठेवतो जो धाकात राहतो त्याला सुद्धाआपल्याला समोरच्या

व्यक्तीची गरज आहे ह्या विचाराशी तो पक्काअसतो. दोघांनाही आपण एकटे पडू हि भीती सतावत असते. हा स्नेह अकार्यक्षमस्नेह आहे. कधी कधी तर हे दोघे इतके एकमेकांवर अवलंबून असतात किह्यामुळेआपली क्रियाशीलता मारली जाते ह्याचे भानही त्यांना नसते. ह्या स्नेहातउदत्तता कमी आनंद कमी पण धाकच जास्त असतो. शिवाय एकमेकांच्या दुराव्याचीभीती असते. बऱ्याचदा जीवनात असं घडत कि ज्याच्यावर आपण मनापासून विश्वासटाकला होता ती व्यक्ती कालांतराने ह्या गोष्टी नाकारते आणि आपण पुन्हास्वत:ला एकटे समजायला लागतो. त्या व्यक्तीने आपणास रागविले तरी आपला स्नेहकमी होत नाही. मानसशास्त्रीय संकल्पनेत सांगायचे झाले तर आपण  बनतो. आणि त्यातून सुटका करून घेण्यापेक्षा पुन्हा आपला एकाकी पणाघालविण्यासाठी नवीन शोध मालिका सुरु होते. पण मग ह्यावर उपाय काय?उदात्तप्रेम.ते कसं असत?विद्यार्थ्यांना आता उदात्तप्रेमाबद्दलऐकण्याची खूप उत्सुकता होती पण आता वेळ होती गृहपाठ ची.

मी त्यांना गृहपाठदिला की तुमच्या आयुष्यातील असे तुमचे प्रेमाच्या लोकांची नवे लिहाज्यांच्या प्रेमळ धाकात राहावयास आपणास आवडते. तसेच अशाही व्यक्तीची नवेलिहा ज्यांच्या धाकात तुम्हाला राहायला आवडत नाही. आणि आजच्या सत्रातीलमहत्वाचा गृहपाठ म्हणजे तुम्ही स्वत: कोणत्या स्नेहवर्गात तेलिहा. विद्यार्थी लगेचच लिहायला लागले.

# TRUE LOVE PART 7

मॅडम असं लक्षात आलं की आम्ही ज्याला ज्याला म्हणून आजपर्यंत प्रेमसमजलो तो स्नेह होता आणि आमच्या मनात जे दुःख किंवा जी मनातल्या मनात घुसमटहोतेय ती ह्या स्नेहा मुळे मोकळी होत नाहीये. खूप घुसमट होतेय. आता फक्तआणि फक्त उदात्त प्रेम हवं ज्यात आम्हाला मोकळा श्वास घेता येईल,ज्यातफक्त आणि फक्त आनंद मिळेल.

असं बघा मुलांनो ज्यावर आपण आपले प्रेम व्यक्तकरतो त्यानंतर आपल्यात कोणत्या भावना निर्माण होतात हे खूप महत्वाचेआहे,स्वतः ला प्रश्न विचारा कि ज्याच्या प्रति मी प्रेम व्यक्त करतो आहेत्यामुळे माझ्या मनात नेमके कोणते विचार येतात?अर्थात उदात्त विचार येतातकि हलक्या दर्जाचे विचार येतात,आपले मानसिक सामर्थ्य वाढतंय कि कमीहोतंय. त्याच्या मुळे माझे कर्तृत्व वाढते कि कमी होते?हे प्रश्न स्वतःला विचारा. प्रश्नांची उत्तरे सकारात्मक असली तर समजा तो स्नेह नसून प्रेमआहे. पण नकारात्मक उत्तरे आली तर मात्र तो स्नेह आहे. पण ही स्नेहभावना शारीरिक ते कडे गेली तर त्याचे पर्यवसान दुःखात होईल. कारण इंद्रियसुख हे क्षणिक आहे. आणि ह्या सुखाच्या अतिरेकाचा परिणाम स्वरूप दुःख चभोगावे लागते. ह्याउलट खरे प्रेम करणारा व्यक्ती हि शरीर सुखात अडकतनाही. त्याचे प्रेम हे चैतन्ययुक्त असते,आपण ज्याच्यावर प्रेम करतोत्याच्याकडून तो प्रेमाचीअपेक्षाही करीत नाही,

प्रेम चैतन्ययुक्त असतम्हणजेच त्या व्यक्तीचे प्रेम समोरील व्यक्तीच्या हृदयात प्रवेशित होत आणितो त्या प्रेमाचा आनंद घेतो. म्हणजे काय?विद्यार्थ्यांचाप्रश्न,हे बघा आपण जेव्हा दुसऱ्यावर प्रेम करतो तेव्हा त्यानेही आपल्यावरतेवढेच प्रेम करावयास हवे असे आपल्याला वाटते न. मग त्याने प्रेम करावे हाभाव ठेवण्या पेक्षा माझे त्याच्या वर प्रेम असावे आणि हा फक्त हृदयाशीसंवाद असावा. असे घडले तर आपोआपच आपल्या त्याच्याकडून अपेक्षा राहणार नाहीआणि प्रेमाच्या अनंदलाहरी आपल्यामध्ये उचंबळून येतील. आपण त्याच्याहृदयावर प्रेम करतो आहे ही भावना आपल्याला उदत्तता देईलच पण त्याचसोबतज्याच्यावर आपण प्रेम करतो त्यालाही उदत्तता प्राप्त करून देईलअशाप्रेमात मग दोघेही एकरूप होतात, पण ह्या प्रेमात स्पर्धा नाही, एकमेकांवरमात करण्याची भावना नसते, तेथे फक्त एकमेकांना आनंद देण्याची भावनाअसते. कुणीही कुणाला दुखावत नाही, हे प्रेम कोणत्याही परिस्थितीत कमी होतनाही. हे प्रेम कशालाही घाबरत नाही. ह्या प्रेमाला कोणत्याही सीमा बांधूशकत नाही. ह्यात समज गैरसमज होत नाही. असे प्रेम जर आपण करीत असू तर हेप्रेम काहीही मागत नाही. ते फक्त आणि फक्त आनंदच देत. खरं प्रेम म्हणजेकाय रे. देणं असत ते. आपल्या प्रेमास्पदला. फक्त देणं. घेणं त्यालामाहीतच नसत. आणि देणं म्हणजे तरी काय रे?कोणतीही परतफेडीची अपेक्षा नकरता. प्रेम हीच तर एक वस्तू आहेआपल्याजवळ जी मौल्यवान आहे. आणि जिचेमूल्य दिल्याने जास्त वाढते. आम्हाला बँक बॅलन्स वाढविणे जमते पण कधीतरीहा अनंदाचाही बॅलन्स वाढवून बघा. मुलांनो आपल्याला कुणाचे तरी

प्रेममिळावे हा आपला अधिकार न समजता मी कुणावर तरी प्रेम करावे हा आपला हक्कसमजून तर पहा बघा तुम्हालाही प्रेमाचा अधिकार मिळेल. किती द्यावं म्हणजेकिती मिळेल हा त्या ठिकाणीभावाचंनको.आपला प्रेमळ हक्क आपण मान्यकरायलाच हवा. आपण इतरांवर केलेलं अपेक्षाराहित प्रेम हाच आपल्या प्रेमाचामोबदला आहे.

पण मॅडम पुष्कळदा असं घडत कि मला जेवढं प्रेम मिळालं तेवढंचमी देईन किंवा मला मी देतो त्याहीपेक्षा जास्त प्रेम मिळावं असेवाटते,कधी कधी तर जे लोक माझ्यावर प्रेम करतील त्यांच्यावरच मी प्रेम करेलअशी पण आमच्या मनात भावना येते. हे काय आहे?

मित्रानो हा मनाचाअत्यंत कमकुवत पणा आहे. का वाट बघायची कि माझ्यावर कोण किती प्रेम करतायते. तुमच्याकडून प्रेमाचे बिनतारी संदेश जाऊ द्या. म्हणजेच समोरच्याव्यक्तीबद्दल फक्त प्रेमाचीच भाव ठेवा. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरप्रश्न चिन्ह होते पण आता गृहपाठाची वेळ होती.

आजचा गृहपाठ होतानिसर्गातील कोणत्याही पाच घटकाची नावे लिहा ज्यांनी मानावजातिकडूनपरतफेडीची अपेक्षा केली.



# TRUE LOVE PART 8

निसर्गातील एकही घटक असा नाही जो मानावजातिकडून कशाची अपेक्षा करेल. निसर्गाला फक्त देणे माहित आहे, आणि माणसाला निसर्गा पासून घेणे माहित आहे. त्यामुळे तर समतोल बिघडला न. देताच राहतो म्हणून निसर्ग मुक्त असतो आणि ह्या मुक्ततेची अनुभूती तो आपल्यालाही देतो.

प्रेम देणं हि स्वातंत्र्याची अनुभूती आहे तर प्रेमाची मागणी करणं हे गुलामगिरीचे द्योतक आहे. मित्रानो जगात सर्वात सुंदर भावना कोणती असेल तर ती प्रेमाची. आणि स्वतंत्र आणि मुक्त प्रेम हे आपले जीवन अतिशय सुंदर बनवितो. अशा सुंदर जीवनाची अनुभूती कुणाला नको वाटेल ?ह्यासाठी काय करावं लागेल ?विद्यार्थ्यांचा प्रश्न ह्यासाठी सुरवातीला फक्त निरीक्षण करा की इतरांकडून कायम प्रेमाची अपेक्षा करणारा माणूस आपल्या प्रत्यक्ष जीवनात किती दु:खी आहे,,निराश आहे, अपेक्षित प्रेम पदरात पडले तर तो आनंदी होणार अन्यथा त्याच्या दु:खाला पारावार राहत नाही, त्याला जीवनात नैराश्य येते.

जीवन हे अतिशय दु:ख मय आहे असे त्याला वाटते एवढेच नाही तर त्याला त्याच्याच जीवनाचे ओझे वाटायला लागते. असे लोक तुमच्या आसपास असतीलच त्यांना आठवा. त्यांचे दु:खा ने पोळणे बघा आणि त्यापासून काही निश्चित पणे धडा घ्या, स्वामी चिन्मयनानंद म्हणतात,' **"Don't Beger Of Love, Be The Doner Of Love"** मला तर हा प्रेमाचा महामंत्रच वाटतो.

विद्यार्थी खूप विचारात पडले. त्यांना हा महामंत्र खूप आवडला

होता,म्हणजे मॅडम तुम्हाला असे म्हणायचे आहे का कि आपला जन्म हा फक्त इतरांवर प्रेम करण्यासाठीच झाला आहे ?अगदी बरोबर. आपण ह्या मानवी देहात जन्म घेतला तोच मुळात सर्वांवर प्रेम करण्यासाठी.आपल्याकडे ईश्वराने प्रेमाचा महासागर दिला आहे फक्त आपल्याला त्याची जाणीव नाही म्हणून स्वत:ला आपण सतत सूचना द्यायला पाहिजे की मी प्रेमाचा याचक नाही तर प्रेमाचा दाता आहे. प्रेमाच्या बाबतीत आपण दानशूर असले पाहिजे पण असं प्रेम करता येत ? का नाही करता येणार? आपण राम, कृष्ण, भगवानबुद्ध, नानक देव,महंमद पैगंबर जेवढे म्हणून थोर धर्माचे नेतृत्व करणारे आहेत त्यांचे अनुयायी नाही? आपण स्वत: ला जेव्हा अनुयायी म्हणतो तेव्हा त्यांनी सांगितलेल्या मार्गावर जाण्याची जबाबदारी आपली असते. अनुयायी होणं सोपं नाही. आपण त्या व्यक्तीचे अनुयायी नसतो तर त्यांनी सांगितलेल्या तत्वांचे अनुयायी असतो. ह्या सगळ्यांनी सार्वभौम प्रेमाचा संदेश दिला आहे. आपण जर अनुयायी असू तर आपण प्रेमाची कला शिकलीच पाहिजे.पण मॅडम ते अवतार होते थोर होते,त्यांच्या दैवी गुण होते. पण आपण सर्व सामान्य आहोत. आपल्याला हे कसे जमेल?मित्रानो आपण सामान्य आहोत हे आपल्याला वाटण हीच तर असमान्यत्वाकडे जाण्याची खूण आहे. आपण अनुयायी आहोत थोरांनी सांगितलेल्या मार्गावरून जाणे आणि त्यांच्या वाटेवर आपल्याही पाऊलखुणा उमटविणे हेच तर आपले जीवन कर्तव्य आहे. त्यांनी आपल्याला प्रेमाचा मार्ग सांगितला आपण द्वेषाचा मार्ग अवलंबू तर आपण खरंच अनुयायी आहोत का ? विचार करा. म्हणून प्रेम तर कराच पण माझ्यावर कुणी प्रेम करीत नाही म्हणून रडत बसू नका. मॅडम ह्यासाठी तुम्ही स्वत: काय प्रयत्न करता?विद्यार्थ्यांचा प्रश्न फारच मार्मिक होता. मित्रानो मी तुम्हाला पुन्हा एका महामंत्राची

आठवण करून देते. **"Don't Beger Of Love, Be The Doner Of Love"** हा महामंत्र जेव्हा स्वामी चिन्मयनंदानी दिला तेव्हापासून मनात प्रेम हि संकल्पना रुजली,,गुरुदेवांनी म्हटले होते की माझी लाडकी मुले व्हामित्रानो आपण आपल्या गुरूंचे लाडके शिष्य असावे असे कुणास नाही वाटणार. मग मी हि त्याला अपवाद कशी राहील ?पण मॅडम अपमानाचे,मन दुखवणाऱ्या,अगदी आपल्या जवळच्या व्यक्तीकडून,असे काही प्रसंग आयुष्यात आले,समोरची व्यक्ती माझा राग करते आहे हे मला माहित आहे तरीही मी त्याच्यावर प्रेम करावे असे आपणास म्हणायचे आहे का?आणि असे केले तर लोक मला दुबळे बावळट नाही समजणार? अरे लोक तुमचा राग करतात अपमान करतात आपल्याशी वाईट वागतात हे तर नित्याचे प्रसंग आहेतच,,ह्यात नवीन ते काय,,हे सर्व जेव्हा ते करतात तेव्हा ते स्वत: चे मन किती गढूळ करीत असतात, त्याचा पहिला त्रासाचा तरंग त्याच्याच मनात उठतो त्याचा त्रास जो राग करतो त्याला जास्त होतो,मित्रानो माझ्या कानात कोणते शब्द जावे हे माझ्या हातात नाही पण मी मनाला कोणते शब्द लावून घ्यावे हे तर माझ्या हातात आहे न. हा अभ्यास महत्वाचा आहे,आयुष्यात प्रत्येकाला माफ करीत राहावे,प्रत्येकावर प्रेमाचं करावे.हा माझा अभ्यास तर मी करू शकतो. सुरवातीला कठीण जाईल पण नंतर तो जीवन जगण्याचा मार्गच होऊन जाईल.वर्गात खूप स्तब्धतानिर्माण झाली. आता गृहपाठाची वेळ होती. गृहपाठ होता तुमच्या आयुष्यात ज्या ज्या लोकांनी तुमचं मन दुखावलेला आहे तुमचा अपमान केला आहे त्यांची यादी तयार करून त्यांच्याशी प्रेमाचे संवाद वाढविण्याचा प्रयत्न करा. प्रयत्न करण्याबाबतचा दृढनिश्चय मला विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होता.

# TRUE LOVE PART 9

आयुष्यात असे अनेक प्रसंग येतात ज्यात आपल्या प्रेमाचा कस लागतो,आणि आपल्यालाच मग पडताळून पाहता येते की मी खरोखर समोरच्या व्यक्तीवर प्रेम करतो आहे किंवा नाही,अशाप्रसंगांना आपण कसे सामोरे जातो हे खूप महत्वाचे आहे,कारण अशा वेळी आपल्या मनात हाविचार येऊ शकतो की माझी प्रेमात फसवणूक तर नाही झाली?पण मित्रानो फसवणूक तुमची झालेली नाही कारण तुमचे तसूभरही प्रेम कमी झालंनाही,ह्याउलट फसवणूक समोरच्या व्यक्तीची झालीआणि त्याची परिस्थितीही केविलवाणी झाली आहे हे निश्चित समजा.कारण जो प्रेम करणेनाकारतो तो जीवन नाकारतो आणि ह्या जिवंतपाणीच्या मरणयातना आहेत हे विसरू नका.आणि म्हणूनच समोरील व्यक्ती प्रेम करते कि द्वेष करते हे महत्वाचे नसून मी प्रेम करतो की द्वेष करतो हे महत्वाचे आहे.आपल्या जीवनाचा पोत ह्यानेच ठरतो,म्हणून हीच नित्याची पूजा व प्रार्थना करायला हवी.स्वामी चिन्मयनंदांचे एक छान वाक्य आहे परमेश्वरा सभोवतालच्या व्यक्तींचे आम्हास प्रेम मिळो अथवा न मिळो पण मला मात्र सगळ्यावर प्रेम करण्याची क्षमता देआपण केवळ ह्या वाक्याचे चिंतन केले तरी ती एक प्रकारची आपली साधनांचा असेल.

बऱ्याचदा हे सर्व करताना आपल्याला असेही वाटते की मला समोरील व्यक्ती दुबळे तर नाही ठरविणार ? त्याच वेळी निश्चय करा की प्रेम करणे हा दुबळेपणा नाही. ते आपले सामर्थ्य आहे. आणि नि:स्वार्थ प्रेम हि तर सर्वात मोठी संपत्ती. सर्व भौतिक संपत्ती काळाच्या ओघात नाश पावली तरी प्रेम संपत्ती नाश पावणार नाही. आयुष्यात

लाभलेली किर्तीही कदाचित काळाच्या ओघात वाहून जाईल पण प्रेम मात्र अबाधित. मित्रानो लक्षात घ्या जेवढे म्हणून थोर पुरुष होऊन गेलेत ते जगाच्या स्मरणात का आहेत? कारण त्यांनी कुणावर तरी प्रेम केले. देशावर केले,मानवावर केले,ईश्वरावर केले,अगदी जनावरांवर पण केले.आणि त्यांच्या ह्या प्रेमळ कार्यानेच ते अजरामर झाले.

विद्यार्थी खूपच स्तब्ध झाले होते,,मॅडम आम्ही ह्या दृष्टीने तर त्यांच्या कार्याकडे पहिलेच नाही. ग्रेट, मित्रानो ह्या सर्वांचे व्यक्तिमत्व अभिव्यक्त होत तेच मुळात त्यांच्या प्रेमळस्वभावामुळे,आणि मग त्यांच्या व्यक्तिमत्वात एक प्रकारचे सामर्थ्य निर्माण होते. ते सर्वांचे असतात. ते कधीच एकटे नसतात.

म्हणजे मॅडम आपण इतरांवर प्रेम करतो तेव्हा आपला एकाकी पणा संपतो?अर्थातज्या क्षणाला आपण सर्वांवर प्रेम करतो त्या क्षणी आपले विश्व समृद्ध होते,आपला एकाकी पण राहताच नाही. प्रेम आणि एकाकी पणा हे समीकरणच जुळत नाही.पण अम्हितर प्रेमामुळे एकाकी पणा आला नैराश्य आलं असे आमचे कितीतरी मित्र बघितले . आणि काही जणांना तर इतका एकाकी पणा नैराश्य आले की त्यांनी अक्षरश:मृत्यू जवळ केलामित्रानो ह्याचे कारण काय असेल असे तुम्हास वाटते?विद्यर्थ्यांचे उत्तर खूप छान होते ते म्हणालेज्यांच्या आयुष्य असे नैराश्य आले त्यांनी आपल्या प्रेमाची मर्यादित सीमा आखली होती. त्यांचे प्रेम हे उथळ होते. म्हणजे केवळ एकच व्यक्ती आणि तिचीच प्राप्ती ह्या पुरतेच मर्यादित होते. त्या प्रेमात देण्यापेक्षा घेण्याचीच भावना होती,ते प्रेम मालकी हक्क गाजवू इच्छित होते. माझा प्रेमास्पद फक्त माझाच असावा तो कुणाचाही असू शकत नाही,हि त्याची भावना

दृढ झालेली असते. विद्यर्थ्यांचे ह्या उत्तराने मी खूप आनंदी झाले,विद्यार्थ्यांना खरे प्रेम समजते आहे ही बाब माझ्यासाठी खूप आनंदाची होती.

मित्रानो लक्षात ठेवा प्रेम देणं हे श्वास घेण्याइतक महत्वाच असत,प्रेम देणं म्हणजे वाढ होणे. प्रेम करणे म्हणजे समृद्ध होणे,जगतावरील प्रेमाने जेव्हा आपला अणुरेणु व्यापतो न तेव्हा जीवन समृद्ध आनंदी बनते.अशे व्यक्ती मग प्रेमाचे धनको बनतात.जग त्यांच्याकडे प्रेमाच्या अपेक्षेने बघायला लागते.आपण प्रेमासाठी त्यांचे मग श्रद्धास्थान बनतो.एक नेहमी लक्षात ठेवा जेव्हा जेव्हा आपण इतरांकडून प्रेम मिळण्याची अपेक्षा करतो तेव्हा तेव्हा आपण बंधन स्वीकारत असतो. इतरांवर प्रेम करण्याची आपली क्रिया अगदी सहज असावी. म्हणजे काय?विद्यार्थ्यांचा प्रश्न.म्हणजेच झाडाला पालवी फुटणे हि किती सहज प्रक्रिया आहे अगदी तशीच. मित्रानो तुम्हाला वाटतंय न आपण श्रीमंत असावे? मग प्रेम द्यायला शिका. आणि देऊ कोण शकेल?ज्याच्याजवळ असेल. आणि हे कामावावेही लागेल न. ज्याच्या जवळ असेल तोच देईल. आपल्या जवळ जी संपत्ती आहे तिचेच दान देता येईल. दान देण्यासाठी दोन गोष्टींची गरज असते एक म्हणजे ज्याचे दानद्यायचेती वस्तू आपल्याजवळ आणि आपलीच असावी आणि दुसरे म्हणजे ती निरपेक्ष दानकरण्याची माझी तयारी हवी. हीच तयारी आम्हाला करायची आहे. आता वेळ होती ती गृहपाठाची. आजचा गृहपाठ होता

तुमच्या आयुष्यात आलेल्या अशा व्यक्तींची नावे लिहा ज्यांच्यावर तुम्ही नितांत प्रेम करता पण त्यांच्या मनात तुमच्याबद्दल प्रेमभाव नाही. अशा व्यक्तींच्या बाबतीत आपले वर्तन कसे असेल?

# TRUE LOVE PART 10

ज्यांच्या मनात आपल्याबद्दल प्रेमभाव नाही त्यांच्यावरही प्रेम करणे खरंच किती कठीण आहे. पण अशक्य निश्चित नाही. प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे ? आपण जेवढे इतरांवर प्रेम करतो तेवढे आपले चित्त शुद्ध होत जाते. मित्रानो एक प्रयोग करा. एका बाटलीत स्वच्छ पाणी घ्या त्यात एकाच थेंब शाई टाका,पाण्याचा रंग बदलेलते पाणी पिण्याच्या वापरण्याच्या लायक राहणार नाही अगदी तसेच आपल्या अंत:करणात एखादा गैरसमज निर्माण झाला तर ते अंत:करण अशुद्ध बनते. पण मॅडम गैरसमज तर होणारच आपण माणसे आहोत आपल्याला मन आहे,मित्रानो अगदी खरंय गैरसमज होणार राग येणार पण त्यावर उपाय आहे न. आपण आता अशुद्ध झालेल्या पाण्यात सातत्याने शुद्ध पाणी ओतूया. काय घडते ?थोड्यावेळाने पाणी पुन्हा स्वच्छ झाले. ह्यातून तुम्हाला काय बोध मिळाला ?एखाद्याबद्दल वाईट विचार मनात येईल,गैरसमज होतील,होऊ द्या,हरकत नाही पण हे वाईट विचार घालविण्यासाठी त्या ठिकाणी चांगल्या विचारांची ताबडतोब स्थापना करावी लागेल. हा मुद्दा विद्यार्थ्यांना खूपच भावला होता.कितीतरी वेळ विद्यार्थी प्रयोग करण्यात गुंग होते. आणि आपल्या मनातील रागाचा निचरा शुद्ध प्रेमाने होऊ शकतो हे हि त्यांना भावले होते.आपण सर्व जण प्रेम ह्या गुण संपत्तीने समृद्ध होऊया. ज्यांच्याकडे प्रेम आहे आणि जोसर्वांवर प्रेम करतो तो खरंच श्रीमंत आहे,पण काही लोक असेही असतात की ते इतरांकडून प्रेम मिळवतात पण ते मात्र इतरांना प्रेम देत नाही त्यांना काय म्हणता येईल?

मित्रानो असे लोक कृपण आहेत. दरिद्री आहेत. हे लोक प्रेम

केल्यासारखे भासावतील,तुमच्यावर खूप प्रेमाचा वर्षाव करतील.इतका कि आपल्यावर खरे प्रेम फक्त आणि फक्त तेच करू शकतात असेही काही काळ आपल्याला वाटेल,आणि कालांतराने त्यांचे प्रेम कमी होते तेआपल्यालाटाळायला लागतात. मग आपल्या मनात येणे स्वाभाविक आहे की स्वत: च्या स्वार्थापोटीत्यांनी माझ्यावर प्रेम केले.असे एक नाही अनेक अनुभव आपल्याला येतात,काही लोक आपल्याला मूर्खातही काढतात,आपण करतोय हे चूक तर नाही झाली असेही आपणास वाटते.आणि ह्याच क्षणाला आपण सावध होण्याची गरज आहे,कारण आपण अपेक्षेने आपले प्रेम कलंकित करू नये. पण मॅडम आपल्या ह्या स्वभावाचा लोक फायदा घेतील. आपल्याला वापरून घेतील,आणि टाकून देतील,मग किती मनाला यातना होणार.त्या कशा सांभाळायचा?

हे बघा मित्रानो ज्यामुळे समोरच्या व्यक्तीचे भले होते आहे तेथे जर आपला उपयोग होतो आहे तर असा विचार तुम्ही करू शकणार नाही का कि ह्या ठिकाणी परमेश्वराने माझी नेमणूक केली आहे ? ते ईश्वरीय काम समजून आपण केले आणि ते ईश्वरालाच समर्पण केले तर त्याकामाच्याप्रशंसेची आपल्याला गरजच भासणार नाही.आणि अशी वृत्ती जर आपण विकसित केली तर काम झाल्यावर आपणच आपणहून बाजूला होऊ.कुणी आपल्याला बाजूला करण्याचीत्याठिकाणी गरजच राहणार नाही आणि मग दु:खा चा प्रश्नच उद्भवणार नाही.अरेबाप रे किती कठीण आहे सर्वविद्यार्थी मित्रानो आपल्याला आता एकेक पायऱ्या चढायचा आहेत न.मग आपली मानसिक ताकद तर वाढवावीच लागेल.प्रेमाचीच गुणसंवर्धन करावेच लागेल. नाहीतर मी त्याच्यासाठी इतके केले पण त्याला माझी कदर नाही ही भावना आयुष्यभर तुम्हाला पोखरतराहणार हे

मात्र लक्षात असू द्या,आणि हे पोखरणे तुम्हालाच त्रास देईल,हा त्रास हि वण वण थांबवायचीअसेल तर जाऊन सांगा त्या व्यक्तींना जे तुमचा राग करतायेत कि भल्या माणसा तू कितीही माझा राग कर पण मी मात्र तुझ्या सद्गुणांवरच प्रेम करायचे ठरविले आहे,तुला वागायचे तसे वाग. पण ह्याचा परिणाम काय होईल?ह्याचा परिणाम निश्चित चांगला होईल. पहिला फायदा तर तुम्हालाच होईल कारण तुमच्या अशा वागण्याने तुमचे चित्त शुद्ध होईल ते शांत होईल. दुसरा फायदा कालांतराने जी व्यक्ती तुमचा राग करीत होती तिला त्याची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही. दोन्ही बाजूनी तुमचाच फायदा आहे. कारण तुमचे त्या व्यक्तिवारील प्रेमही कमी झाले नाही.आणि तुमचे मनही विचलित झाले नाही कारण तुम्ही त्याच्यावर आताही प्रेमाचं करीत आहात.बरोबर आहे न.

मित्रानो ह्या शुद्ध प्रेमाला खूप हळुवार हाताळावे लागत.असे वागलात न तर आपोआप समोरच्या व्यक्तीच्या मनात तुमच्या बद्दलचा स्नेह फुलत जाईल.आणि समजा हा स्नेह नाही फुलला तरी वाईट वाटून घेऊ नका.कारण तुम्ही त्यांच्या सद्गुणांवर प्रेम करण्याचे अभिवाचन दिले आहेपुढाकार तुमचा आहे.आता वेळ होती ती गृहपाठाची. पण आज मीच विद्यार्थ्यांना विचारले की आजचा गृहपाठ तुम्हीच ठरवा आणि त्यात मी पण सामील असेल. विद्यार्थ्यांनी गृहपाठ दिला.

ज्या लोकांनी माझा राग केला त्यांची यादी तयार करून त्याच्या सद्गुणांवर आम्ही प्रेम करतो. तुझ्यातल्या चांगल्या गुणांवर प्रेम करतो हे त्याला विदित करायचे. ,प्रत्येक जण आज एका वेगळ्याच उत्साहात होते.

# TRUE LOVE PART 11

ज्यांनी आपला राग केला त्यांना मी तुझ्यावर प्रेम करतो हे सांगण्याचा पुढाकार विद्यार्थ्यांनी घेतला. आणि ही क्रिया केल्यावर मनात खूप शांत आणि आनंदाचे भाव निर्माण झाले होते कारण आता कमीतकमी माझ्याकडून तरी राग द्वेष नव्हता तर फक्त आणि फक्त प्रेम.हा अनुभव खूप छान होता.हाच पुढाकार घेताना आमचा अहंकार आडवा आला होता पण आम्ही तो बाजूला करून हा पुढाकार घेतला,हे सांगत असताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे सात्विक भाव लक्षात येत होते.पण ह्यापुढे आपण ज्याच्या बाबतीत पुढाकार घेतला त्यांची कृती काय असेल?


मित्रानो ज्यांच्या बाबतीत तुम्ही पुढाकार घेतला तोकुठेना कुठे तुमच्या वाक्याने सुखावतो. काही दिवस विचार करतो. त्याच्या रागाची धार हळू हळू बोथट होते. त्याला सर्व पूर्वीचे दिवस आठवतात,आपण प्रेमभावनेला वंचित झालो आहोत ह्याची त्याला तीव्रतेने जाणीव होते आणि मग त्याच्या मनात पुन्हा तुमच्याबद्दलचे प्रेम फुलते.पण त्याच्या मनात प्रेमाचे भावाचं उत्पन्न झाला नाही तर?आपण किती वाट बघायची ? विद्यार्थ्यांचा प्रश्न,मित्रानो एक वाक्य नेहमी लक्षात ठेवा "Do The Best And Leave The The Rest To The God" खूप भावला हा मंत्र त्यांना.त्यांच्या मनाची भूमी बरीच तयार झाली होती. आणि मला जाणवले की हीच वेळ आहे की आता प्रेमाची मूलतत्त्वे सांगावयास हवीत. प पू स्वामी चिन्मयानंदनी प्रेमाची काही मूलभूत तत्वे सांगितली आहेत. विद्यार्थ्यांमध्ये खूप जिज्ञासा. त्यातील

पाहिले मूलतत्त्व आहे,प्रिय व्यक्तीच्या प्रेमावरची आस्था व कळकळम्हणजे काय?आपल्या मनात कायम आपण ज्याच्यावर प्रेम

करतो आहोत तो आनंदी असला पाहिजे ही तळमळ हवी.म्हणजेच माझ्या प्रत्येक वर्तनामागे माझ्या प्रिय व्यक्तीला आनंद देण्याची भावना हवी,मग त्यापासून मला कितीही त्रास होवो.तो त्रास मला त्रास वाटता कामा नये, कारण माझी प्रत्येक कृती माझ्या प्रेमस्पदच्या आनंदासाठी आहे ही भावनाच प्रबळ हवी. आशा निर्मळ प्रेमाचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे आई.सृजनाचे दुसरे नाव आई आहे,वेदनेशिवाय सृजन नाही,वेदनेशिवायआनंदनाही,आणिह्या वेदनेतून मिळालेल्या आनंदाला पारावार नाही मर्यादा नाही.आई जे प्रेम करते त्यात आपले बाळ सुखी व्हावे आनंदी व्हावे ही तळमळ असतेच न. एखादा देशभक्त जेव्हा देशावर प्रेम करतो तेव्हा तो देशावर राष्ट्र प्रेमाचीच उधळण करतो.आपण फुलांवर प्रेम करतो झाडावर प्रेम करतो तेव्हा त्यांची किती काळजी घेतो.त्यांना खत पाणी घालतोच न. एवढेच नाही तर आपण जनावरे पाळतो त्यांचीही काळजी घेतो. एखादा आपला मित्र अडचणीत असेल तर त्याला मदत करतो,,तुमच्या शिक्षकावर तुम्ही प्रेम करता. हे सर्व करीत असताना त्याठिकाणी आपल्याप्रेमास्पदला आनंद व्हावा हीच आपली भूमिका असायला हवी. आणि ती असतेही. काही लोकांकडे तर कुत्र्याला कुत्रा म्हटलेलाही चालत नाही.इतके त्यांचे प्रेम असते,हे सर्व कशासाठी तर माझ्याप्रेमामुळे समोरच्या घटकाला आनंद मिळावा. पण हे तुमचे प्रेम तुमच्या आचरणातून व्यक्त व्हायला हवे. अभिव्यक्त व्हायला हवे. आई वडिलांवर प्रेम आहे म्हणायचे आणि त्यांची अवज्ञा करायची. प्राण्यावर प्रेम करायचा आणि त्यांना शारीरिक त्रास द्यायचा. शिक्षकांची अवज्ञा करायची. बहीण भावंडाना त्रास द्यायचा,आपल्याच देशाबाबत द्रोह करायचा हे प्रेम नाही, ह्याला प्रेमातील कळकळम्हणत नाही. म्हणून खरे प्रेम असेल तर ती व्यक्ती

आपल्या प्रेमसपदाच्या आनंदासाठी दक्ष असते हे विसरू नका. आणि हे प्रेम व्यक्त पण करा. प्रेम व्यक्त करायला वेळ लावू नका. आयुष्य क्षणिक आहे. व्यक्त प्रेमालाच खरा अर्थ आहे,अव्यक्त प्रेम एकतर्फी असण्याचा व त्यात फसगत होण्याची शक्यता जास्त असते,नव्हे मी तर म्हणते जे आपल्या वर्तनातून अभिव्यक्त होते व ज्यामुळे आपल्या प्रेमसपदाच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्यासाठी धडपड करते तेच खरे प्रेम आहे.

मॅडम काही व्यक्ती आपला राग करतात पण आपले मात्र त्यांच्यावर खूप प्रेम असते अशावेळी काय करायचे ?मित्रानो समोरच्या व्यक्तीला तुमच्यापासून दूर राहण्यात आनंद आहे आणि तुम्ही त्यांच्या आनंदासाठी झटत आहेत काय कराल?विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले,पण ह्या तत्वाची उकल अधिक होणे आवश्यक होते. पण आता गृहपाठाची वेळ. तुम्ही ज्यांच्यावर प्रेम करीत आहात त्यांचा आनंद कशा कशात आहे हे निरीक्षण करा आणि लिहून काढा. हा गृहपाठ विद्यार्थ्यांना खूपच आवडला.



# TRUE LOVE PART 12

मित्रानो खरे प्रेम हे व्यक्त व्हायलाच हवे, आपल्या जीवलागला आनंद व्हावाह्यासाठी आपण झटलेच पाहिजे,कारण जीवलंगाच्याच आनंदात आपला आनंद दडलेलाअसतो,दिव्य आणि खरे प्रेम करणाऱ्या प्रेमी ला आपल्या प्रेमासाठी कोणतेहीदिव्य करण्यात आनंद असतो,मातृभूमिसाठी सर्वस्वाचा त्याग करणारे किती तरीलोक आपल्याला माहीत आहे,त्यांनी देशासाठी घर दार संसाराचा त्याग केला,कारणत्यांचे देशावर अपार प्रेम होते.देशाची कीर्ती वाढविण्यासाठी त्यांनीसर्व वैयक्तिक सुखाचा त्याग केलेला आहे,आई वडील आपल्या वैयक्तिक सुखाचात्याग करून आपल्या मुलांना चांगले जीवन देण्याचा प्रयत्न करतात.प्रसंगीकष्ट करतात अर्धपोटी राहतात,पणआपल्या पाल्याला शिकवितात. आज कितीतरीशिक्षक असे आहेत जे प्रसिद्धीपासून दूर ग्रामीण भागात अध्यापनाचे कार्यकरीत आहेत,हे सर्व का घडत माहीत आहे?ह्या सर्वांचे जे आपल्या जीवलगासंबंधी चे दिव्य प्रेम आहे हेच दिव्या प्रेम त्यांना कार्य ऊर्जा कार्यप्रेरणा देते. हे कष्ट मग कष्ट राहत नाही कारण ह्या कष्टापासून पणआनंदाचीच निर्मिती होते.जेथे प्रेम आहे तेथे कष्टआहेत. आणि हे दोनहीजेथे आहे तेथे आनंदाशिवाय दुसरे काहीच नाही. ह्याचे मूर्तीमंत उदाहरणतुमचे आई वडील आहे,हो न. हे विद्यार्थ्यांना खूपच भावले कारण माझ्यामहाविद्यालयात येणारे बरेच विद्यार्थी हे अत्यंत गरीब कुटुंबातूनअसतात,कष्टकरी असतात. मित्रानो जेथे मनापासून प्रेम आहे नतेथे मनापासूनकष्ट करण्याची तयारी पण असते हे नेहमी लक्षात ठेवा.आणि ह्याचदृष्टिकोनातून आपले प्रेम शुद्ध असले पाहिजे,पण

मॅडम आई वडील कष्ट उपसूनअत्यंत प्रेमाने मुलाला शिकवितात त्या पैकी काही आई बाबांच्या नशिबातवृद्धाश्रम का येतो. त्यांच्या प्रेमात काही अपूर्णता होती का?विद्यार्थ्यांच्या ह्या प्रश्नाने मी खूप अस्वस्थ झाले. मी त्यांनाप्रतिप्रश्न केला कीमुलांनो शेतकरी खूप छान दर्जेदार बियाणे पेरेल खतपाणी देईल त्याची निगराणी करेल हे सर्व तो मनापासून करतो करण तो त्याच्याशेतीवर अपार प्रेम करतो पण ती जमीनच चांगली नसेल तर दोष कुणाचा?बियाणेरुजलेच नाही दोष कुणाचा?मित्रानो आई वडील संस्कारात कमी करणार नाही पण ज्यामूळ वासना घेऊन आपण जन्म घेतला त्या आपल्या मनोभूमीत त्या रुजल्याचनाहीत.दोष कुणाचा. मुलांचे प्रेम स्वार्थी बिकाऊ बनले की त्यातीलदिव्यता निघून जाते आणि तेथे प्रेम हा फक्त व्यवहार राहतो,आणि मग हाव्यवहार संपला की प्रेमही आटून जाते.तेथे प्रेमच व्यवहार बनतो. समजलेअसे की खरे प्रेम दिव्य तर असतेच पण ते व्यवहारारहित असतेआणि अशाप्रेमाची अभिव्यक्ती खूप आवश्यक आहे, शिवाय हे प्रेमच व्यक्तीला मगप्रमाच्या जीवलंगाच्याच आनंदासाठी काहीही दिव्य करण्याची प्रेरणादेते.मॅडम खरच किती अलौकिक आहे हे. किती आनंद वाढविणारे आहे हे. मीकुणावर तरी निष्पाप प्रेम करतो ही किती ऊर्जा देणारी गोष्टआहे,विद्यार्थी खूप भारावलेले होते. आपल्या जीवळगंबद्दलची कळकळ त्यांनाखरच कळली होती. आज गृहपाठांच्या ऐवजी आम्ही दिव्य प्रेमावरची गाणीऐकण्याचे ठरविले. प्रेम स्वरूप आई. गे माय भू तुझे मी,,प्रेमा काय देऊतुला,भाग्य दिले तू मला,भरजरी ग पितांबर,,आम्ही सर्वांनी खूप संगीताचा आनंदघेतला,नादब्रह्माची उपासना केली,,प्रेमभावनेत सर्व चिंब झालेहोते,,त्यांचे रमून जाणे बघितले आणि मी वर्गाच्या बाहेर अतिशय आनंदाने आले

# TRUE LOVE PART 13

आपल्या जीवलगा बद्दल ची वाटणारी कळकळ,त्याला आनंद मिळावा ही धडपड,त्यासाठी अगदी आपल्या जीव लागचा त्याग करावा लागला तरी त्याच्यावरचा प्रेमाने ते शक्य होते आणि तेच खरे दिव्या प्रेम आहे. आणि हे प्रेम अभिव्यक्त झाले पाहिजे. हे सर्व भारावून टाकणारे होते,आता वेळ होती ती दुसऱ्या मूलतत्वाचा विचार करण्याची. मित्रानो प पू स्वामी चिन्मयनंदानी प्रेमाचे जे दुसरे मूलतत्त्व सांगितले आहे ते आहे****आपल्या प्रिय व्यक्तीच्या प्रेमाबद्दल ची आपल्या मनात उमटलेलीप्रतिक्रिया***म्हणजे काय?हे बघा आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्याच्या मनाशी विचारांशी एकरूप होण्याचा आपण प्रयत्न करतो आणि हा प्रयत्न सफलाही होतो,कारण आपण आता निरपेक्ष प्रेमाची एक पायरी ओलांडली आहेआणि आता आपण हळूच दुसऱ्या पायरीवर चढत आहोत.निरपेक्ष प्रेमामुळे चित्त शुद्ध होते आणि मग आपल्या प्रेमी जनांच्या मदतीची त्यांच्याजीवनातआनंद फुलविण्याची कायम आपल्याला ओढ असते.आणि आपले प्रेम जसजसे वाढू लागते तसतसे आपल्यालाच मग आपल्या प्रेमीजनांच्या अपेक्षा कळू लागतात. ह्या अपेक्षा आपल्याला पूर्ण करायच्या आहेत व आपल्या प्रेमीजनाना आनंदी करायचे आहे ही भावना जन्म घेते एवढेच नाही तर आपण त्या अपेक्षा पुरवू शकतो ही जाणीव आपल्या ठिकाणी निर्माण होते.

मॅडम आम्ही आतापर्यंत हेच समजतो आहोत की निरपेक्ष प्रेम म्हणजे आपण कुणाकडून अपेक्षा करायची नाही पण आज प्रथमच कळतंय की आपल्या प्रेमी जनांच्या अपेक्षेच्या लहरी आपल्या मनात निर्माण होतात आणि आपल्याला त्या पूर्ण करण्यासाठी सक्षमता पण येते,किती सुंदर कल्पना आहे, आणि म्हणूनच कदाचित असे म्हणत असावे की देणे म्हणजे प्रेम,बरोबर न मॅडमएक नि:स्वार्थ प्रेमाची नवीनच

संकल्पना विद्यार्थ्यांना मिळाली. जीवनातील सर्वात आनंददायी काम कोणते असेल तर ते म्हणजे माझ्या प्रेमी जनांकडून मी कोणती अपेक्षा करण्यापेक्षा त्यांच्या आशा आकांशा पूर्ण करणे. आणि त्यासाठीच धडपड करणे.

पण मॅडम आपले प्रियजन आपल्यापासून दूर असतील तर त्यांच्या अपेक्षा आपल्याला कशा कळणार ?मित्रानो म्हणून तर प्रेमात एकरूपता असायला हवी. अगदी आईच्या प्रेमात असते तशी. तुम्ही सर्व इथे आलात,काही जण आपले गाव सोडून ह्याठिकानी आलात. असे कितीतरी वेळा घडलं असेल की तुम्ही उदास झालात घरच्या आठवणीने आणि आईचा फोन आला. हो असे बऱ्याचदा किंबहुना नेहमीच घडतेविद्यार्थ्यांचे उत्तर. ह्याचे काय कारण असेल?कारण एकच आहे की आई ची तुमच्या बद्दलची एकरूपता एकजीवता. आपण आपल्या प्रेमी जनांच्या सुख दुःखहशी एकरूप होतअसू तर आपल्यालाही हाच अनुभव येईल. मग मला कुणीच समजून घेत नाही ही तक्रार राहणार नाही.

मला कुणी समजून घेण्यापेक्षा मी कुणाला समजून घेतले आहे का हे महत्वाचे आहे. आई मुलाला समजून घेतले तसेच मुलं आईला समजून घेते का हे महत्वाचे आहे. हे जर घडलं असत तर आपल्या लहानपणी आपले पालक त्यांच्या म्हातारपणी आपले पल्या झाले असते बरोबर न. मित्रानो तुम्ही खरच कुणावर प्रेम करता न तेव्हा त्याच्या सुख दुःखच शी एकरूप व्हा,,अगदी त्याचा त्याच्या आनंदासाठी त्याग करावा लागला तरी त्याला समजून घ्या. काही दिवस त्रास होईल पण त्यात ही भावना प्रबळ असेल की माझ्या ह्या कृती मुळे माझा प्रिय आनंदी झाला आहे त्याच्या जीवनातील समस्या कमी झाल्या आहेत. म्हणजे ही तर सहानुभूती युक्त प्रतिक्रिया झालीअगदी बरोबर. आणि ही क्षमता फक्त खऱ्या प्रेमातच निर्माण होते कारण तेथे फक्त द्यायचे असते. घ्यायचे काहीच नसते. आपले

प्रेम स्वार्थी बनायलाच नको.

पण मॅडम हे सर्व करताना समज गैर समज ह्यांच्याशी कसा सामना करायचा?विद्यार्थ्यांचा प्रश्न योग्यच होता. पण मित्रानो समोरच गैर समज करो किंवा समज ते महत्वाचे नाही तुमचा समज काय आहे हे महत्वाचे आहे दुसऱ्याच्या भावनांशी वेदनांशी जमवून घेण्याची वृत्ती ह्यालाच आपण आधुनिक परिभाषेत समनुभूती म्हणतो ही कला आपल्याला जमलीपाहिजे,समनुभूती असली की इतरांच्या अपेक्षेच्या जाण आपल्याला येते,हे एक जीवांकौशल्य आहे आणि तेअवगत होणे गरजेचे आहे,ह्या गुणामुळे आपण आपल्या प्रत्येक कार्यात यशस्वी होतो मगआपल्याकडे कोणतीही भूमिका येवो अथवा कोणतेही कार्य येवो आपण त्यात यशस्वी होतो हे नक्की  लक्षात राहू द्या,तुम्हाला हे सर्व सांगण्याचे करण की जीवनातील आपला प्रवेश प्रेम युक्त असावा,,तुम्ही प्रेमाने भारावलेले असाल तर तुमच्या आजूबाजूचे वातावरण आनंदी प्रेमळ व सकारात्मक असेल आणि ह्या सकारात्मकतेतून तुमच्या हातून नेहमी चांगलेच कृत्य घडेल,,म्हणून केवळ प्रेमकलेची जाणीवच नाही तर तर ती जाणीवपूर्वक वाढवा. हे सर्व विद्यार्थ्यांना खूप आवडतं होते. प्रेम हा विषयच प्रत्येकाला आवडतो. दोन मूलतत्वांची ओळख विद्यार्थ्यांना झाली होती

१. आपल्या प्रेमीजनांसाठी आपल्या ऱ्हिदयात कळकळ हवी

२. हीच कळकळ आपल्या ऱ्हिदयात आपल्या प्रेमी जनांबाबत प्रतिक्रिया निर्माण करते.

हे दोनीही घटक एकमेकांशी निगडित आहे. कळकळ असेल तर प्रतिक्रिया उमटते आणि ह्या प्रतिक्रियेतून पुनश्च प्रियजनांबाबत कळकळ निर्माण होते.

आजचा गृहपाठ होता की आपल्या आसपासच्या किमान तुम्हाला शक्य असेल तेवढ्या लोकांना ही प्रेमाची महती समजावून सांगा व त्याच्या प्रतिक्रिया जाणून घ्या.

# TRUE LOVE PART 14

आपल्या आसपासच्या लोकांना खऱ्या प्रेमाबद्दल सांगताना विद्यार्थी खूप भारावले, प्रेमाबद्दल बोलताना आमचाही प्रेमभाव उचंबळून येत होता आणि आमच्यात आनंदाची उर्मी तयार करीत होता हा विद्यार्थ्यांचा अनुभव माझ्यासाठी खूपच प्रेरणादायी ठरला,पण आता वेळ होती प्रेमाचे तिसरे तत्व सांगण्याची. मित्रानो स्वामी चिन्मयनंदानी प्रेमाचे तिसरे तत्व सांगितलं आहे ते म्हणजेप्रियजनावरच्या प्रेमाचा आदर व पूज्य बुद्धी

पण मॅडम पहिल्या दोन तत्वांचा आणि ह्या तिसऱ्यातत्वांचा काही परस्पर संबंध आहे का?हो निश्चितच आहे,,आपल्या प्रेमीजनाबद्दल ची कळकळ असते म्हणूनच आपल्याला त्यांचे अंतर्मन समजते आणि त्यामुळेच त्यांच्या जीवनात आनंद फुलावा ही प्रतिक्रिया आपल्यात निर्माण होते,पण ह्या दोन्ही गोष्टी तेव्हाच घडतील जेव्हा आपल्या मनात आपल्या प्रेमीजनाबद्दल आदर व पूजनीय भाव असेल.पण हे कसे शक्य आहे प्रत्येकाबाबत मनात आदर कसा राहील?त्यालाही उत्तर आहे केवळ प्रेमामुळे. त्यांच्यावरील प्रेम व त्याच्याबद्दल वाटणारी कळकळ ह्या गोष्टी असतील तर आपोआपच मनात आदर निर्माण होईल पूज्य भाव निर्माण होईल,मग तुमच्या अंत:कर्णाची पातळी कोणतीही असू देत,वास्तविक पाहता आपल्याला ईश्वराने अंत:कारणांची खूप सखोल पातळी दिली आहे पण आपण खूपच वरवरचे प्रेम करतो आणि प्रेमात दु:खी होतो,अर्थात वरवरचे प्रेम म्हणजे बहिरंगावरील प्रेम होय,पण त्या व्यक्तीच्या अंतर्मनात आपण डोकावतच नाही,समनुभूतीने ते शक्यहोते,शिवाय आपल्या ऱ्हिदयाच्या प्रेमाचे संगीत आपण सतत सुरू ठेवायचे त्याचे स्वर

ज्याच्यासाठी ते आहेत त्यांच्या पर्यंत पोहोचल्याशिवाय राहत नाहीत.अगदी वृंदावनात कृष्णाने बासरी वाजवली की त्या बासरीचे स्वर गो गोपी ह्याच्या पर्यंत पोहोचताच होते. शिवाय बासरी हे अहंकार शून्यतेचे प्रतीक आहे,आपल्या प्रेमासाठी अहंकार शून्य होऊन ऱ्हिदयाच्या संगीत सुरू केले ते निश्चित पणे ते आपल्या प्रिय व्यक्तीच्या ऱ्हिदया शी संवाद साधल्याशिवाय राहत नाही. आणि मग ह्याचा परिणाम म्हणजे तेथे प्रेमाचीच सूर निघतात. पण ह्यासाठी प्रिय व्यक्तीबद्दल नितांत आदर व पूज्यभाव असावा लागतो.

पण मॅडम आदर आणि प्रेम भाव एकत्र कसे नंदतील कारण बऱ्याचदा आपल्याला असे लक्षात येते की एखाद्या व्यक्तीबद्दल आदर असतो पण प्रेम असेलच असे नाही आणि प्रेम असते पण आदर असेलच असेही नाहीविद्यार्थ्यांची ही शंका बरोबर होती. मित्रानो प्रेम ही मनाची अभिव्यक्ती आहे आणि आदर ही बुद्धीची अभिव्यक्ती आहे आणि म्हणूनच ह्या दोन बाबी व्यवहारात भिन्न वाटतात,,कारण मन आणि बुद्धी ह्या दोन सूक्ष्म व्यक्तिमत्वाचे घटक आहेत,आणि ह्या दोन्ही घटकांचा समन्वय होणं तेही आवश्यक आहे,मन हे बुद्धीच्या अधिपत्या खाली यायला तयार हवं आणि बुद्धीने मनाला आपल्या अधिपत्याखाली घ्यायला हवं,हे दोघेही जेव्हा हातात हात घालून चालतील तेव्हा आदर आणि प्रेम ह्या दोन्ही गोष्टी घडतील,आपल्याला व्यवहारात असे आढळते की आपण फक्त मानाच्याच स्तरावर प्रेम करतो आणि मग भावना विवष होतो,भावनेचा अतिरेक होत आणि मग त्या प्रेमात आदरभाव राहत नाही,मग माझ्या मनाप्रमाणे माझा प्रेमी वागत नसेल तर आपण त्याचा अपमान करतो. प्रेमाबाबत समाजात घडणाऱ्या ह्या घटना तुम्हाला माहित आहेत त्यातील बहुतांशी घटना ह्या भावनेच्या प्रसपोटामुळे घडल्या आहेत.

विचार करा. बऱ्याचदा आपण एखाद्याचा नितांत आदर करतो पण त्यात भावना नसतात. म्हणून अपल्या मनातील प्रेम व बुद्धीच्या स्तरावरचा आदर ह्याचा संयोग होणे अत्यंत आवश्यक आहे असा संयोग ज्या ठिकाणी होतो तेथे पूज्य आदरनिर्माण होतो,,करण हा मन आणि बुद्धी चा निकोप अप्रतिम संयोग आहे.पण ह्यासाठी एक बाब महत्वाची आहे ती म्हणजे आपल्या मनात जीवनाबद्दल चा नितांत आदर असायला हवा,ज्या प्रेमामध्ये आदर नाही ते प्रेम यातना देणारे ठरते,आदरच नसेल तर प्रेमाला व प्रेम नसेल तर आदरालाही अर्थ राहत नाही.पण मॅडम आदर फक्त मोठ्यांचा करायचा की अपल्यापेक्षालाहान असणाऱ्यांचाही करायचा?प्रश्न योग्य होता कारण मोठ्यांचा आदर करावा हे मूल्य त्याच्यात रुजलेले होतेच.मित्रानो व्यक्ती म्हणून तुम्ही प्रत्येकाच्याच आदर करायला हवा. ज्यांच्या वर तुम्हींप्रेम करता त्या सर्वांचा आदर करायला हवा त्याला वयाचे बंधन नाहीच मुळी.जसा आई वडिलांचा आदर ठेवावा तसेच आई वडिलांच्या आपल्या पाल्याचा,आपण हे गृहीत धरतो की आपल्या पेक्षा लहान लोकांनी आपला आदर करावा.पण त्याचवेळी वर्तनाचा हा नियम आपण विसरतो की समोरच्याकडून आपल्याला आदर हवा असेल तर आपल्यालाही त्याला आदरच द्यावा लागेल,जसा ध्वनी तसा प्रतिध्वनी. प्रेम आणि आदर ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असं म्हटलं तर वावग होणार नाही. मित्रानो जमेल तुम्हाला? तुमचा आजचा गृहपाठ आहे तुमच्या सर्व प्रेमीजनांच्या यादी तयार करा त्या यादीत कुणाबद्दल प्रेम कुणाबद्दल आदर वाटतो ते लिहा आणि प्रत्येक प्रेमीजनांच्या बाबतीत आदर प्रेम समसमान करा आता प्रेमाची खूप छान उकल होतेय. विद्यार्थ्यांनाही खूप आनंद वाटतोय. फुलत राहा .

# TRUE LOVE PART 15

आदर आणि प्रेम ह्यांच्या समन्वयातच दिव्य प्रेमाची संकल्पना आहे,म्हणजेच मन आणि बुद्धीचा समन्वय हा दिव्य प्रेमात असतो,पण बऱ्याचदा असेही घडते की आपण अगदी मनापासून समोरच्या व्यक्तीचा आदर करीत नाही,असे का घडते?ह्याचे कारण आपण समोरच्या व्यक्तीच्या प्रेमाशी एकरूप होऊ शकत नाही,आपण प्रेम करतो तेव्हा आपल्या मनात हाच भाव असतो की ह्या प्रेमापासून मला काय फायदा होईल,शिवाय त्याने माझ्या मनाप्रमाणे तर वागवेच पण माझ्या मनात मी त्याच्या बद्दल चे जे चित्र रंगविले आहे त्याच्याशीच त्याचे व्यक्तित्व जुळले पाहिजे हा आपण विचार करतो,म्हणजेच तो समोरच्या व्यक्तित्वाला स्वत: च्या विचारांचे रंग देतो,आणि त्याच्या विपरीत काही आढळले तर लगेच त्या व्यक्तीबाबतचे आपले प्रेम कमी होते.मॅडम ह्या मुद्द्याची जर उकल करून सांगाविद्यार्थ्यांचा आग्रह.मुलांनो असे बघा आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करतो त्या व्यक्तीचे चित्र मनात रंगवितो. हे चित्र रंगविताना त्यात माझे रंग मी भरतो,आणि ह्याच्या विरुद्ध काही आढळले तर त्यामागील सत्य काय आहे हे न बघताच आपण त्या व्यक्तीशी संबंध तोडून टाकतो.हे खरे प्रेम नाही.खऱ्या प्रेमात प्रेमीजनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप असायला हवा. आपल्या प्रिय व्यक्तीबाबत चा निकोप दृष्टिकोन हा दोघांच्याही विकासाला कारणीभूत ठरतो. पण व्यवहारात तसे घडत नाही.आणि मग प्रेमाच्या संबंधांना तडे जातात.ह्या सगळ्यांचे मूलभूत कारण कोणते असेल तर आपली आपल्यात असणारी गुंतवणूक.आपण आपल्या स्वत:च्या कोशात खूप गुरफटलेले असतो,आणि ह्या कोशातून कुणीतरी मला बाहेर काढावे ही माझी अपेक्षा असते.

मित्रानो कोशात आपण गेलोय. निघायचं पण आपल्यालाच आहे. इतरांनी मला बाहेर काढावे अशी अपेक्षा करणारा माणूस इतरांवर नि:स्वार्थ प्रेम नाही करू शकत.करण त्यालाच स्वत: ला कुबडी घेऊन चालण्याची सवय झाली तो इतरांना काय आधार देणार?ह्यांसाठीच आपला अंतर्विकास होणे आवश्यक आहे.आपल्या मनात जीवनाबद्दल माणसाबद्दल पूज्य भाव असला पाहिजेआणि तो तात्कालिक नको तर कायम स्वरूपी असायला हवाआशा ज्या व्यक्ती असतात त्या मग प्रेमाचे आदर्श बनतात. ते इतरांना प्रेम देताताच पण त्यांच्या भोवती एकप्रकारचे प्रेमाचे वलंयच तयार होते,म्हणून मित्रानो प्रेम मिळण्याची संधी शोधण्यापेक्षा प्रेम करण्याची संधी शोधा. तुमच्या लक्षात आले असेल की आपण प्रेमक्षमता अंगी रुजवण्यासाठी तीन मूलतत्वांची गरज आहे

१. आपल्या प्रिय व्यक्तीवर प्रेम करण्याची खरी कळकळ

२. प्रिय जनांच्या भावनांना प्रतिसाद देण्याची क्षमता

३. आपल्या प्रिय माणसाबद्दल आदर विश्वास व समजूतदार पणा ह्या तीनही गोष्टी एका ठिकाणी एकवटल्या तरच तेथे शुद्ध व दिव्य प्रेम निर्माण होते आणि असे दिव्या प्रेम मग एकमेकांचा विकास व्हावा ह्यासाठी धडपडते. पण आपण प्रेम करतो त्या व्यक्तिमत्वाला आपण कसे ओळखायचे?विद्यार्थ्यांचा प्रश्न मूलभूत होता. पण आता गृहपाठाची वेळ होतीआजचा गृहपाठ होता तुम्ही ज्यांच्यावर प्रेम करता पण ज्यांच्याबद्दल मनात गैरसमज आहेत ते प्रिय जनांशी स्पष्ट बोला.

विद्यार्थ्यांच्या मनात मला खूप तगमग जाणवली त्यांच्या आशा प्रियजनांना भेटण्याची ज्यांच्या बद्दल त्यांच्या मनात गैरसमज निर्माण झाला होता. ही समज प्रत्येकाला येवो ही गुरुदेवांच्या चरणी प्रार्थना करून मी वर्गाच्या बाहेर आले.

# TRUE LOVE PART 16

प्रेम ह्या विषयावर खूप बोलावसं वाटतंय. आत्तापर्यंत प्रेम निरपेक्ष प्रेम कळकळ प्रतिक्रिया इत्यादी विषयावर बोलून झाले,पण आता थोडा तत्वज्ञानाचा दाखला देणे गरजेचे होते.स्वामी चिन्मयनंदानी नारदभक्ती सूत्रातील एक सूत्र विदित केले आहेस्य।:ज्ञानमेव साधन मित्येके(सूत्र

ह्याचाच अर्थ शुद्ध प्रेम करण्याचे साधन म्हणजे त्याची जाण असणे,म्हणजे काय?विद्यार्थ्यांचा प्रश्न.मित्रानो बऱ्याचदा आपल्या आयुष्यात असे घडते की आपण एखादी व्यक्ती पाहतो आणि तिच्यावर प्रेम करायला लागतो,हे प्रेम वरवरचे असते,कारण हे बहिरंगावरील प्रेम आहे. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच्या गुणांचीही जाणीव आपल्याला असायला हवी,अर्थात त्याच्या गुणांवर आपण प्रेम करायला हवे,म्हणजेच त्याच्या अंत:करण ची आपल्याला जाणीव हवी ओळख हवी,ही ओळख जसजशी वाढत जाते तसतसे त्या व्यक्तीबाबत आदर प्रेम वाढत जाते,हे समजून घेण्यासाठी बुद्धी अतिशय तीक्ष्ण हवी,बाह्य दिखाऊ स्वरूपाचा भेद करणारी हवी,

एकदा बाह्य स्वरूपाचा भेद झाला की अंतरंगावर प्रेम जडते,आणि असे अंतरंगावरचे प्रेम हे शुद्ध प्रेम आहे. म्हणजे काय?पुन्हा विद्यार्थ्यांचा प्रश्न,अस बघा एखाद्याच्या शारीरिकसौन्दर्यावर भाळून आपण प्रेम करीत असू तर हे सौन्दर्य आज आहे तसे नेहमीकरिता राहील का?आणि हे सौन्दर्य जसजसे कमी होईल तसतसे प्रेम कमी होण्याची शक्यता जास्त आहे.पण त्याचसोबत जर समोरच्या व्यक्तीच्या मनावर बुद्धीवर त्याच्या कलेवर,त्याच्या सूक्ष्म व्यक्तिमत्वावर जर मी प्रेम करीत असेल तर ते प्रेम चिरकाल टिकणारे राहील पण त्यासाठी मला त्याच्या

सूक्ष्म व्यक्तित्वपर्यंत पोहोचावे लागेल,म्हणजेच मलाही माझे आजपर्यंत अजाणतेपणी जपलेला व्यक्तिमत्व आहे ते काही काळ तरी विसरून आपल्या प्रेमीच्या व्यक्तिमत्वात मिसळावे लागते तेव्हाच त्याच्या व्यक्तिमत्वाचा शोध आपल्याला लागू शकतो,तेव्हाच आपले व्यक्तिमत्व त्याच्याशी तादात्म्य पावते.आपण नेमके हेच करीत नाही.आपण शारीरिक स्तरावर आपलेस्वत: चे स्वतंत्र अस्तित्व बाळगतो आणि आपल्या इंद्रियांचे चोचले पुरवितो.ह्या देहबुध्दीतून जोवर आपण बाहेर पडत नाही तोवर शुद्ध प्रेमाची क्षमता आपल्यात निर्माण होत नाही,आपल्या सूक्ष्म व्यक्तिमत्वाचा विकास महत्वाचा आहे,जो पर्यंत हा होणार नाही तोपर्यंत शुद्ध प्रेमाची अनुभूती नाही. एकदा मन बुद्धीचा विकास झाला की आपण मग सर्वमधील केंद्रबिंदू चा शोध घेण्याचा निर्णय घेतो. आता प्रेम ही संकल्पना अजून एक उंचीवर चढते आहे हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले.

वेगळ्या स्तरावर जाणारा ह्या विषयातून आता आत्मिक प्रेमाकडे जातो आहे. मित्रानो एकदा का आपल्याला सूक्ष्म व्यक्तिमत्वाला जाणण्याची सवय झाली की मग एक बाब लक्षात येते की सर्वांमध्ये असे काहीतरी समान तत्व आहे ज्याच्या अधिष्ठानवर सगळे जग आपणास दिसते,मग सर्वात सूक्ष्म व्यक्तिमत्व कोणते ह्याचा आपला शोध सुरू होतो ह्या सूक्ष्म व्यक्तिमत्वाचा शोध घेताना एक बाबीची अनुभूती येते की माझ्यात आणि समोरच्या व्यक्तीत आत्मिक स्तरावर साम्य आहे,ज्या चैतन्याच्या अधिष्ठानवर हे जग आपल्याला दिसते आहे ते अधिष्ठान सर्वांमध्ये आहे. ही ओळखीची खूण पटली की मग आम्हाला सर्वांबद्दल आपुलकी निर्माण होते विषयाची काठिण्य पातळी वाढते आहे हे पाहून मी विद्यार्थ्यांना गृहपाठ दिला. आतापर्यंत प्रेमाच्या मूलतत्वांचे जे विवेचन झाले त्याचे चिंतन करा

# TRUE LOVE PART 17

एकदा माझ्यात जे चैतन्य आहे ते सर्वांभूती आहे असा निश्चय झाला की माझ्यात आणि सर्व चराचर सृष्टीत ऐक्य निर्माण होतो,भेदाभेद मिटतो.ही बाब समजायला अजूनही जरा कठीण जातेय हे माझ्या लक्षात आले. आणि म्हणूनच थोडे शास्त्रीय पद्धतीने विद्यार्थ्यांना सांगायचे ठरविले. आता प्रेम ही एक कला आहे व ती आत्मसात करावी लागते,कधी ती उपजत असते तर कधी ती संपादन करावी लागतेजी उपजत असते तिला फुलवाव लागते आणि जी संपादन करायची असते तिचे शास्त्रशुद्ध ज्ञान घ्यावे लागते. कोणतीही कला अंगभूत असेल तर तिला एकाग्रता सराव शिस्त व त्या कलेसाठी समर्पण भाव लागतो,प्रेमाचेही तसेच आहे,एकदा आपल्याला आपल्यातील प्रेमाची जाणीव झाली की त्याचे संगोपन संवर्धन हे महत्वाचे ठरते,त्यासाठी त्याला एकाग्रता शिस्त समर्पण ह्या गुणांची जोपासना महत्वाचं ठरते,पण जर ही कला आपल्यात नसेल तर ती कला शिकून तिला वृद्धीगत करावी लागेल,करण सर्व कले मध्ये श्रेष्ठ कला कोणती असेल तर ती प्रेमाचीच कला आहे,वास्तविक पाहता आपल्या इतिहासात असे अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी मानव जातीवर फक्त प्रेमाचीच उधळण केली आहे,,त्यांच्या प्रेम देण्याने जगात परिवर्तन घडून आले,तुम्हाला असे काही उदाहरणे माहीत आहेत?लगेच विद्यार्थ्यांनी उत्सपूर्त पणे उत्तर दिले,स्वामी विवेकानंद,स्वामी चिन्मयनानंद,भगवान गौतम बुद्ध, रामकृष्ण परमहंस,त्यांचे मानव जातीवरचनव्हेतर अखिल सृष्टीवर जे प्रेम होते ह्या प्रेमातूनच त्यांनी जगात परिवर्तन घडवून आणले. मित्रानो ह्या सर्वांचे चरित्राचा अभ्यास केला तर त्यांच्याही जीवनात बऱ्याच

अडचणी आल्यात पण ते खचले नाही,मानवजातीवर त्यांचे खरेच प्रेम आहे का हे पाहण्याचे प्रसंग ही आपल्याला त्यांच्या चरित्रात बघावयास मिळतात पण प्रेम निष्ठे पासून ते ढळले नाहीत,त्यांनी अव्याहत पणे फक्त आणि फक्त प्रेमच केले,ही त्यांची उपजत जीवन कला होती,पण आपल्याला जर ही शिकायची असेल तर आपल्याला त्यातील शास्त्र शिकावेच लागेल.

आता मात्र विद्यार्थ्यांची जिज्ञासा खूपच वाढली होती,मित्रानो व्यक्ती कडून कोणतीही कृती जेव्हा घडते ती कृती कोणाच्या तरी प्रेमापोटीच घडते किंवा स्वतः च्या तरी प्रेमापोटी घडते ह्यांच्याशी आपण सहमत असलाच,ह्या त्याच्या क्रियेत दोन गोष्टी समाविष्ट असतात

१. मनात प्रेमभावना जागृत होणे.

२. जागृत झालेली प्रेमभावना प्रेम इतरांना वाटणे,हातचे काहीही न ठेवता.

पण मॅडम बऱ्याचदा अस घडत की आपल्या मनात प्रेमभावना असते आपण ती व्यक्तही करतो पण त्याचा विपर्यास होतो. आणि त्याचा मग खूप त्रास होतो असे का होते? विद्यार्थ्यांचा प्रश्न बरोबर होता. मित्रानो जेव्हाही कुणावर प्रेम कराल तेव्हा ते प्रेम धवल असले पाहिजे. म्हणजे आपल्या प्रेमात स्वार्थ,लोभ,अहंकार,गर्व लालसा वासना ह्या गोष्टींची सरमिसळ व्हायला नको ह्यामुळे प्रेमाचा रंग धवल राहत नाही. पण ह्या सर्वांची सरमिसळ न करता प्रेम केले तरीही आपल्याबद्दल गैरसमज होत असतील तर आपण नेमके काय करायचे?मित्रानो तुम्ही कोणतीही सरमिसळ न करता समोरच्या व्यक्तीवर प्रेम करता पण त्या व्यक्तीचे चित्त शुद्ध नसेल आसपासच्या इतरांचे चित्त शुद्ध नसेल तर त्याचा निश्चित विपर्यास होईल पण

डगमगून जाऊ नका. आपण कुणाच्यात परिवर्तन घडवून आणू शकत नाही,पण आपण आपला प्रेमाचा धर्म सोडायचा नाही. आपण मानवजातीवर प्रेम करणे सोडायचे नाही त्यात स्वार्थ आणायचा नाही,आपल्या प्रेमात स्वार्थ आला की लक्षात घ्या आपल्या प्रेमाचा तलाव सुकणार आणि मग प्रेमाच्या ओलाव्यासाठी आपल्याला इतरांवर अवलंबून राहावे लागणार.जेव्हा जेव्हा इतरांनी माझ्यावर प्रेम करावे मला प्रेमाची गरज आहे अशी धारणा निर्माण होईल तेव्हा तेव्हा लक्षात घ्या तुमच्या जवळचा प्रेमाचा सागर आटला आहे,सर्वप्रथम त्याचे सिंचन करा,आधी इतरांना प्रेम द्या आपोआप प्रेम तुमच्या पर्यंत चालत येईल हा वर्तनाचा क्रिया प्रतिक्रियेची नियम आहे.विद्यार्थ्यांना हे सर्व नवीन होते. पण त्यांना हे सर्व पटत होते. आणि आता तर प्रेमाची मूलतत्त्वे आणि प्रेमाची गृहितकृत्ये ही त्यांना कळली होती. आता

सर्वप्रथम प्रेमभावना जागृत होण्यासाठी आपल्या अंतः कारणांची मशागत करणे आवश्यक होते,पण त्यासाठी स्वामी विवेकानंद, स्वामी चिन्मयनानंद,भगवान गौतमबुद्ध इत्यादी महामानावांची चरित्रातील असे स्थळे विद्यार्थ्यांनी शोधणे गरजेचे होते त्यामुळे ह्या सर्वांच्या मनात अपार करुणा निर्माण झाली. शिवाय स्वतः च्याही जीवनातील असे प्रसंग अवलोकन करण्याची आवश्यकता आहे की जे प्रसंग आपल्याला प्रेमाच्या मार्गाकडे जाण्यासाठी सूचित करतात. आणि हाच आजचा गृहपाठ होता.

# TRUE LOVE PART 18

आपण ज्यांना ज्यांना म्हणून आदर्श मानले त्यांच्या जीवांचारित्राचे अवलोकन केले तर ही बाब नक्की लक्षात येते की त्यांनी अखिल सृष्टीवर अपार प्रेम केले आहे,आणि प्रेमाची उधळण जगावर केलेली आहे.आणि त्यामुळे ते प्रेमाचे धनको झालेले आहे,व त्यांचेही आयुष्य इतरांसाठी आदर्श ठरले आणि हे केवळ प्रेम ह्याच गुणामुळे.आता ही बाब विद्यार्थ्यांच्या ध्यानी आलेली होती,आता प्रेमाच्या बाबतीत पुन्हा थोडी उंची गाठणे आवश्यक होते,आता प्रश्न असा उद्भवला की ही जी प्रेमभावना आहे ती आपल्यात निवासाला केव्हा येईल? मित्रानो आपल्याला एखाद्या घरात निवास करायचा असेल तर कशाची आवश्यकता असते?एकतर ज्या घरात आपल्याला निवास करायचा आहे त्यांची निवास करू देण्याबाबत तयारी असावी. दुसरे महत्वाचे म्हणजे तिथे तेवढी जागा मोकळी हवीविद्यार्थ्यांचे हे उत्तर अगदी बरोबर होते.आपल्या मानाच्याही असेच असते,आपल्यामनात प्रेमाला निवारा द्यायचा असेल तर एकतर आपल्या मनाची तयारी हवी आणि दुसरे सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या मनातील दुरविचाराचा जो कचरा आहे ,स्वार्थीपणा गर्व लालसा वासना ह्याचा त्याग आपणास करावा लागेल,आणि मन स्वच्छ करावे लागेल. आणि मनाची ही स्वच्छता करण्यासाठी आपल्याला हेतुपुरस्सर प्रयत्न करावे लागतील,म्हणजेच आपल्याला आपल्या मनाला शिस्त लावून घ्यावी लागेल,वाईट विचारांना मनात प्रवेश नाकारणे आणि त्याठिकाणी सद्विचारांचे स्थापना करणे,आणि मग जीवनात कितीही कठीण प्रसंग येवोत ह्या सद्गुणांचा पाठपुरावा सोडता येणार नाही. आणि जे मन सद्गुणांची निवासस्थान बनते तेच खऱ्या अर्थाने प्रेम करू शकते त्याच मनात मग प्रेमही निवासाला येते. पण मॅडम बऱ्याचदा असेही होते की आपण ज्यांच्यावर प्रेम करतो ते आपला अपमान करतात,बरोबर आहे,हा आपला नित्याचाच अनुभव आहे की आपण खूप प्रामाणिक

प्रेम करतो पण आपला शुद्ध प्रेम हेतू त्यांच्या लक्षात येत नाही मग तेआपल्याबद्दल अपशब्द वापरतात,आपल्या मनातील कोमल भाव त्यांच्या पर्यंत पोहोचताच नाही,मग त्यांनी आपल्या बद्दल वापरलेल्या अपशब्दने आपणास खूप त्रास होतो.पण ह्याच वेळी खरे तर स्वतः ला सांभाळण्याची वेळ असते.हीच वेळ आहे आपल्या मनाला योग्य वळण लावण्याची,अशावेळीस्वत:लातपासून पहा की आजपर्यंत मी ज्यांच्यावर प्रेम केले त्यांनी माझ्याबद्दल वापरलेल्या अपशब्दने माझ्या मनात त्यांच्या बद्दल राग किंवा द्वेष तर निर्माण होत नाही न. आणि तुम्ही त्यांच्यावरील प्रेम तसूभरही कमी करू नका. हेच तुमच्या मनाला लावलेली स्वयंशिस्त असेल.आपण आपला प्रेमामार्ग सोडून चालणार नाही कारण प्रेम देण्यासाठीच आहे. हे देत। देता तुम्हाला थकवा येईल कंटाळा येईल पण असे करून चालणार नाही.ह्या मार्गात अनेक चांगले वाईट अनुभव येतील पण आपल्याला आपला ध्येय मार्ग सोडून चालणार नाही ही स्वयंशिस्त आहे,हा एक प्रकारचा आत्मनुभव आहे कारण हे सगळे माझे अनुभव असतात.आणि ह्या सगळ्या अनुभवातून एकदा का आपण कच्चे पक्के दुवे जाणले की आपला प्रेमाचा मार्ग सुकर होतो. मित्रानो ही प्रेमाची आत्मप्रचिती आहे. आणि ही आपल्याला घ्यायचं आहे. बऱ्याचदा असेही। घडते की आपण ह्या अपमानाने खचून जातो,अगदी आपले मन थकून जाते,आणि प्रेमाचा परिणाम जर असाच असेल तर प्रेम तरी का करायचे?असाही विचार तुमच्या मनात येईल.हे विचार मनात येऊ द्या,पण लगेच आशा वेळी हा विचार करा की कुणीही निरपेक्ष प्रेम करीत नाही म्हणून काय झाले पण मला त्याचा काहीही विचार करायचा नाही. कदाचित असाच विचार करून तुम्ही थकून जालपण अशा वेळी थकून चालणार नाहीतुम्ही ज्यांच्या वर प्रेम केले आणि त्यांनी तुमच्याबद्दल अपशब्द वापरून तुमचा अपमान केला,तुमचे मन दुखावले,तुम्हाला प्रेमात कमकुवत ठरविले,तुमच्या प्रेमाला लाथाडले त्याच्या बद्दल प्रथम मनात प्रेम दृढ करा,हाच तुमचा आजचा गृहपाठ आहे.

# TRUE LOVE PART 19

ज्यांनी आपला अपमान केला आपले प्रेम लाथाडले त्यांच्या बद्दल प्रेम दृढ करणे कठीण आहे पण असाध्य नाही,त्यासाठीच तर प्रेमाची कला आपल्याला शिकावी लागेल.मित्रानो कोणतीही कला शिकायची असेल तर त्याकरिता सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मनाची एकाग्रता.कोणतीही कला शिकण्यासाठी ही अत्यंत मूलभूत अशी बाब आहे,संगीत साधक चित्रकार खेळाडू नृत्यकार अशी कोणतीही कला घ्या त्यामध्ये सर्वप्रथम मनाची एकाग्रता आवश्यक आहेएकदा का मनाची एकाग्रता वाढली की मन प्रेम देणे ह्या बाबी वर इतके एकाग्र होईल की मग माझा कुणी अपमान केला कोण मला बोलले ह्या गोष्टीकडे तुमचे लक्षच जाणार नाही,ज्या गोष्टींनी आपली शांतता भंग होते त्या गोष्टीकडे आपले लक्ष जाणार नाही.मनाला तिकडे बघायला वेळच मिळणार नाही. ही गोष्ट खरच अचंबित करणारी आहे.कलेच्या प्रांतात जे लोक नवीन असतात त्यांना तर अतिशय कष्ट करून ही बाब साध्य करावी लागते पण जे लोक जातिवंत कलाकार असतात त्यांना ही बाब उपजतच असते,कलाकार हा सतत कलेच्या सरावातच असतो व हा सराव करता करता त्याला मनाची एकाग्रता साध्य होते अगदी असेच आपल्याला प्रेम देण्याचा सातत्याने सराव करून प्रेमाबाबत ची एकाग्रता आवश्यक आहे,मॅडम म्हणजे प्रेम कले मध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात,हे आमच्या लक्षात आले आहे त्या म्हणजे मनाची स्वयंशिस्त व मनाची एकाग्रता,अगदी बरोबर आहे.

पण बऱ्याचदा मित्रानो असंही घडत की आपण कलेकडे छंद म्हणून बघतो,पण प्रेमकडे मात्र तुम्ही छंद म्हणून बघू नका,काही व्यक्तींना

काही क्षणापूरतेच प्रेम करण्याचा छंद असतो असे लोक स्वतः चे त्याच सोबत इतरांचेही जीवन खराब करतात,प्रेमाचा छंद लागू द्या पण त्याला जीवन ध्येय बनवा,छंद म्हणून प्रेम करण्यात आणि खेळणे समजून टाकून देण्यात आपण आपले संपूर्ण आयुष्य तर वाया घालवतोच पण आपण स्वतः चिच फसवणूक करीत असतो. आणि दुर्दैवाची बाब म्हणजे आपल्याला होणारी आपली फरफट केविलवाणी अवस्थाही समजत नाही,म्हणूनच मित्रानो वेळीच जागे व्हा,प्रेमाला आपले ध्येय समजा ह्या कलेला वाहून घ्या,ह्यामुळे जीवनाचा आनंद तर वाढेल,पणत्याचसोबत ही जी कलेबाबत ची आत्मीयता आहे ती आत्मीयता तुमच्यात त्याग भावना निर्माण करेल,क्षमता निर्माण करेल आणि तुम्हाला आनंदी जीवनाचा मार्ग सापडेल.आणि मग तुमच्यावरही सगळे प्रेम करायला लागतील,तुम्हाला मग जगात एकटेपणा जाणवणार नाही,एवढेच नाही तर इतरांना सुद्धा तुमच्याशिवाय बिलकुल करमणार नाही,एवढेच नाही तर जीवनात येणारे अपयशालाही तुम्ही घाबरणार नाही.पण ह्यासाठी तुम्हाला प्रेमाला वाहून घ्यावे लागेल.

मॅडम प्रेम ही कला आहे,हे तर समजलाच पण ज्यांना ही कला अंगी वृद्धीनगत करायची त्यांनी तीन गुण अंगी बाळगावे लागतील (१)मनाची एकाग्रता,,(२) मनाची स्वयंशिस्त(३)प्रेमाला वाहून घेण्याची वृत्ती.

विदयार्थी खूप भारावले होते. हे सर्व इतके उदात्त आहे हे त्यांना प्रथमच कळत होते. आज मात्र त्यांना स्वतःचे निरीक्षण करण्याबाबत मी सूचित केले व आपण उपजत प्रेमाच्या संदर्भात कलाकार आहेत की आपणास ही कला वृद्धीनगत करावी लागेल ह्याबाबत निर्णय घ्यावयास सांगितले.

# TRUE LOVE PART 20

मित्रानो प्रेमकला वृद्धीनगत करण्यासाठी काही गुणधर्माचा आपण विचार केला,पण लक्षात ठेवा प्रेमकलेत सराव खूप महत्त्वाचा आहे,,प्रेमाचे हे झाड असे आहे ज्यात बीज प्रेमाचे आणि खातपाणीही प्रेमाचीच आवश्यक आहे,प्रत्येकाला ह्यात यश केव्हा लाभेल हे नक्की नाही,कधी कधी आपल्याला अपयश आले आहे असेही वाटेल पण निराश होऊ नका,प्रेम देणे सुरूच ठेवा,आपल्या अंतरंगातून फक्त प्रेमलहरिच निघू द्या,कोणतीही कला शिकताना त्यात चुका होणार अपयश येणार पण नाराज होऊ नका,चुका व शिका हा सिद्धांत लक्षत ठेवा.

मित्रानो तुम्ही पहिल्या वेळी जेव्हा सायकल शिकलात तेव्हा कितीदा तरी पडले असाल,आणि उठून पुन्हा सायकल चालवायला लागले असाल,तुम्ही लहान मूल पाहिले न,रंगताना चालताना किती पडते,धडपडते पण चालणे शिकायला सोडत नाही. अगदी तसेच प्रेम कलेत पारंगत झाल्याशिवाय प्रेमाचा पाठपुरावा सोडू नका. ह्यात येणाऱ्या अपयशाने खचू नका,त्यातील अडथळ्यांना जुमाणु नका, बघा एकदिवस तुम्ही केवळ ही कला आत्मसतंच नाही तर त्यात पारंगत व्हाल,पण ह्यासाठी सर्वात महत्वाचे आहे ते आपल्याला दुसऱ्यांच्या गुणांचे रहस्य कळायला हवे,म्हणजेच आपण समोरच्या व्यक्तीचे गुण जाणून घ्यायला हवे,त्या गुणांचा पाठपुरावा आपल्याला जमला पाहिजे,हा पाठपुरावा करता करता आपल्यात ते गुण कसे येतील ह्याचा आपण विचार करायला हवा आणि त्यासाठी समोरच्या व्यक्तीच्या गुणांवर आपण प्रेम करायला हवे,बघा प्रत्येक व्यक्तीत काहींना काही चांगले गुण असतातच,ह्या गुणांचा शोध घेण्याची

आपली वृत्ती होणे महत्त्वाचे आहे ही वृत्ती झाली की त्या गुणबद्दल प्रेम वाढवायचे. हे सर्व करताना आपल्या मध्ये गर्व अभिमान आला तर इतरांच्या गुणांबद्दल आपणास आदर राहत नाही,तसेच समोरच्या व्यक्तीच्या छोट्या चुकाही खूप मोठ्या वाटतात त्याच सोबत विश्वासही महत्वाचा आहे,किंबहुना विश्वासच प्रेमाचा आधार आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही,आपण दुसर्याबद्दल विश्वासच ठेवत नाही त्यामुळे प्रेमात साशंकता निर्माण झाली की मग समोरच्या व्यक्तीत फक्त दोषाच दिसतात,ह्याला खरे प्रेम म्हणता येणार नाही,खऱ्या प्रेमात गुण दोषांसकट स्वीकृती असतेच पण त्याचसोबत आपण समोरच्या व्यक्तीच्या दोषांवरही प्रेम करू लागतोव ह्या दोषातून त्याला अलगद बाहेर काढतो हेच खरे प्रेम आहे,पुष्कळदा आपल्या प्रेमाला प्रतिकूल प्रतिसाद मिळतो ह्याचे कारण कुठेतरी हे प्रेम आपण स्वार्थातून करीत असतो,पण हीच वेळ असते आत्मचिंतानाची,अशावेळी ह्या प्रतिक्रियांचा आपण आव्हान म्हणून स्वीकार करावा व आपल्या मनात समोरील व्यक्तीबद्दल मनातील प्रेमाचा झरा अखंड वाहता ठेवावा.तो त्याच्या पर्यंत पोहोचल्याशिवाय राहत नाही.

मित्रानो आपल्या संस्कृतीने आपल्याला प्रेमाचे दान द्यावयास शिकविले आहे प्रेमाची भीक मागावयास शिकविली नाही,देणार्याने सतत देताच जावे,हा खरा प्रेमयोग आहे,प्रेमानेच जग जिंकता येते.

मित्रानो आपण सर्व भारतीय संस्कृतीचे वारसदार आहोत,तुम्ही हा प्रयत्न कराल?ज्यांनी ज्यांनी तुमच्या प्रेमाला नकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे त्यांच्यातील सद्गुण पहा त्या सद्गुणांचा पाठपुरावा करा,त्यांना सतत प्रेमच्याच वायूलहरी पाठवा. हाच तुमचा आजचा गृहपाठ आहे.

# TRUE LOVE PART 21

प्रेमाबद्दल आपण खूप विवेचन केला आणि ते आमच्या खरच खूप फायद्याचे आहे,आम्हाला एक प्रकारचा आनंदही त्यापासून मिळतोय,पण ह्या प्रेमामध्ये सफलता आम्हास कशी मिळेल?विद्यार्थ्यांचा हा प्रश्न खरच योग्य होता,प्रेम सफल्याची तगमग प्रत्येकात असते,माझे प्रेम सफल व्हावे हे प्रत्येकाला वाटते पण प्रेम साफल्याबाबत मात्र सगळयांच्या संकल्पना ह्या सापेक्ष असतात,विद्यार्थ्यांनाप्रश्न केला की प्रेम साफल्य कशात असावे असे आपणास वाटते?आतापर्यंतच्या विवेचनावरून काही अंदाज बांधता येतो का पहा,प्रेम साफल्य हे माझ्या प्रेमाला समोरच्या व्यक्तीने स्वीकृती दिली आहे किंवा नाही ह्यावर निश्चित अवलंबून नाही हे तर आम्हाला कळले आहेच. पण तरी आपले प्रेम सफल झाले हे कसे समजावे?

मित्रानो असे बघा सृष्टीकर्त्याने जेव्हा ही सृष्टी निर्माण केली तेव्हा ह्या सृष्टीतील प्रत्येक घटकाला त्याने प्रेमाने बांधले,सर्व जीवमध्ये प्रेमाचा न दिसणारा धागा त्यांनी निर्माण केला जिवो जीवस्य जीवनम असे आम्ही म्हणतो.हा प्रेमाचा धागा नसता तर हे जग म्हणजे रुक्ष वाळवंट झाले असते आणि सर्व जीव प्रेम तृष्णेनी व्याकुळ झाला असता वणवण फिरला असता.पण परमेश्वराने तसे केले नाही त्याने प्रेमाची विविध रूपे ह्या सृष्टीवर पाठविली.आणि ह्या प्रत्येक प्रेमाच्या अभिव्यक्ती सह मानवाचा क्रमविकास ठरवून दिला.

ते कसे ते पहा. मित्रानो आपला जन्म झाला तेव्हा सर्वात प्रथम आपल्याला जाणीव झाली ती स्वत: ची,माझ्या अस्तित्वाची. बाळ रडले आणि आनंद सोहळा सुरू झाला.हा माझा माझ्याशी पहिलापरिचय होता.पण हा स्व फक्त देहाशी निगडित होता,त्यानंतर माझा परिचय झाला तो माझ्या आईच्या स्पर्शाशी,माझ्या आईने मला जवळ घेतले आणि तिची स्पर्शाची ऊब मला ह्या जगात माझे

कुणी आहे ही जाणीव निर्माण करून गेले,विचार करा माझ्या आईने आपल्या शरीरातून सत्व कमी केले पण मला सात्विक अमृत पान करवले आणि त्याच्या बळे माझे जीवन फुलत गेले,,प्रेम म्हणजे केवळ देणं असत हे मला तेव्हाच कळलं करण जेव्हा जेव्हा मी आई म्हणून टाहो फोडला तेव्ह तेव्हा आई माझ्या जवळ होती स्वत: ची कोणतीही पर्वा न करता. मी खूप त्रास दिला माझ्या आईला,पण माझ्या आईने त्याबद्दल कधी तक्रार केलीनाही ह्याउलट ती मला कायम प्रेमच देत राहिली.त्यानंतर माझा संपर्क आला तो माझ्या वडिलांशी.

मित्रानो वडील आपल्याला प्रसंगी रागावतात पण त्यातून आपण चांगले घडावे हीच त्यांची भावना असते,,स्वत:च्या गरज कमी करून मुलांना चांगले जीवन देतात,त्यांच्या प्रेमात देणे हाच भाव असतो,त्यानंतर आपला परिचय होतो तो कुटुंबातील इतर सदस्यांशी.इथे मात्र थोडी स्वार्थी भावना आपण शिकतो,येथे आत्मनस्तु कामाय,सर्वम प्रियं भवतिहा नियम लागू होतो,कुटुंबात संमिश्र भावना विकसित होतात.

आपला पुढील विकास म्हणजे आपला समाजाशी येणारा संपर्क,समाजात आपण अनेकदा स्वार्थ परमार्थ आशा अनेक भावना पाहतो.आपला हा क्रमविकासात आता समाजाने मला काही द्यावे ही कायम धारणा असते,पुढचा आपला क्रमविकास म्हणजे आपले राष्ट्र,राष्ट्र बद्दलचे प्रेम,राष्ट्रीय भावना प्रबळ असावी हा संस्कार आपल्यावर होतो.ह्या सर्व क्रमविकासात सगळे मला काही ना काही देताच असतात.पण ह्या सर्वांना मी काय देतो ही भावना माझ्या मनात येते का?

मित्रानो तुम्हाला प्रेम साफल्य माहीत करून घ्यायचे आहे न मग प्रथम एक यादी तयार करा,आपल्या आईपासून सर्वांची नावे घेऊन त्यांनी तुमच्या साठी काय केले व तुम्ही त्यांच्यासाठी काय केले व ह्या प्रत्येक कृती मागील उद्देश काय होतं ह्याची यादी तयार करा हाच आजचा गृहपाठ आहे.

# TRUE LOVE PART 22

मित्रानो प्रेमाचा जैविक क्रमविकास आपण बघितला ह्यात क्रमविकासाचे चरम सीमा ही वैश्विक दृष्टिकोनाचा विकासात होते,म्हणजेच आपला विश्वात्मक दृष्टिकोन हा सर्वांवर प्रेम करण्यास शिकवितो, आणि मग एक क्षण असा येतो की मला चैतन्याच्या स्तरावर सर्वांमध्ये ऐक्य जाणवू लागते,,आपण निसर्गाच्या बाबतीत सुद्धा असाच क्रमविकास करतो, म्हणजेच सुरवातीला बघा आपण आपल्या आजूबाजूचे पशु पक्षी झाडे ह्यांच्यावर प्रेम केले, पंच महाभूतानाच ईश्वर मानले,पण कालांतराने आपल्या लक्षात आले की जे समष्टी मध्ये आहे तेच माझ्यात आहे म्हणजेच जी पंच महाभूते मी बाह्य जगतात बघतो तीच माझ्यात पण आहे नव्हे माझ्या पंच ज्ञानेंद्रियांना ती ज्ञानग्रहणाची मार्ग उपलब्ध करून देत आहे एवढेच नाही तर ज्या पशु पक्षी माणसे ह्या सर्वांवर मी प्रेम केले त्यांचेही मध्ये ह्याच पंच महाभूतांचे अस्तित्व आहे जे बाह्य सृष्टीत आहे जे माझ्यात आहे. मॅडम ह्याचाच अर्थ जसजसा आपला प्रेमाबाबतचा सखोल प्रवास घडेल तसतशी ही दृष्टी आपणास प्राप्त होईल असे आपणास म्हणायचे असेल तर ही दृष्टी काशी विकसित करावी ते सांगाविद्यार्थ्यांचे म्हणणे अगदी खरे होते,,आता प्रेम हा विषय एका विशिष्ट उंचीवर पोहोचला होता,मित्रानो ही दृष्टी आपल्याला जाणीवपूर्वक विकसित करावी लागेल,,म्हणजे पहा आपण बहिरंगाने सर्व वेगवेगळे असू, प्रत्येकाचे नाव रूप एकमेकांहून भिन्नच राहणार आहे.पण सर्वांमध्ये नामरूपात्मक भिन्नता असूनही त्यात काही सारखेपणा आहे का ह्याचा जर आपण शोध घेतला तर तुमच्या लक्षात काही सर्वसामान्य बाबी येतील,त्या आशा की सर्वांचा देह हा पंचमहाभूतात्मक तत्त्वांनी बनला आहे,तसाच माझाही आहे. प्रत्येक ज्ञानेंद्रियांचा कार्य प्रत्येक देहात तेच आहे जे माझ्या देहात आहे.

बरोबर आहे न,प्रत्येक कर्मेंद्रियचे कार्य तेच आहे जे माझ्या कर्मेंद्रियचे आहे,हे ही बरोबर.ह्याही पलीकडची बाब म्हणजे ह्या सर्वाना प्रकाशित करणारे तत्वही एकच आहे जे माझ्यात आहे. हे ही बरोबर. मग सांगा माझ्यात आणि इतर सृष्टीत फरक तो काय राहिला?जो फरक आहे तो नामरूपात्मक आहे,,आणि त्याच्याच अहंकारात आम्ही किती आयुष्य व्यतीत करतो, पण तत्वाच्या स्तरावर ही अभिन्नता लक्षात आली की मग माझी दृष्टी व्यापक होते आणि मग मी सर्व सृष्टीत एकाच तत्व पाहतो आणि ते मी आहे ही धारणा पक्की झाली की माझा दृष्टिकोनाचे नाते मग ज्ञानदेवांच्या दृष्टिकोणाशी एकरूप होते,आणि मी ही मग ह्या विश्वात सर्वदूर ईश्वराचे अस्तित्व पाहतो. मॅडम ह्याचाच अर्थ मी जेव्हा इतरांवर प्रेम करतो तेव्हा मी त्यांच्यातील ईश्वर तत्वावर प्रेम करतोच पण मी आणि तो भिन्न नसल्या मुळे मी स्वतः वरच प्रेम करतो. बरोबर नमुलांनो अगदी बरोबरआपला हा क्रमविकास आणि आपले हे चैतन्याशी एकरूप होणे हेच खऱ्या अर्थाने प्रेम साफल्य आहे,आता विचार करा प्रेम ही संकल्पना किती व्यापक आहे,आणि आम्ही तिला किती संकुचित बनविले,,आता प्रेमाला मर्यादा राहिली नाही,,मी कुणावरही प्रेम करावे हा आत्मविश्वास माझ्या अंगी निर्माण व्हायला हवा. आता प्रेम भावना एकदा चैतन्याशी निगडित झाला की त्यात विरह मिलन ह्या सापेक्ष संकल्पनाही राहणार नाही कारण चैतन्याच्या स्तरावर मी आणि माझा प्रेमास्पद हे वेगळे नाहीच . दोघात अद्वैत आहे हा भाव दृढ होतोआणि आपल्याला मग आपल्यातच आपल्या प्रमासपदाचे अस्तित्व जाणवू लागते,आता प्रेम मागणे किंवा प्रेम देणे ह्या दोन्हीही बाबी चा बिंदू एकाच होतो. तेथे प्रेमाचा धनको किंवा ऋणको राहत नाही. सगळे द्वैत तेथे संपतात,,काळ वेळ अंतर सर्व सर्व मिटून जातं आणि शिल्लक राहत ते फक्त प्रेम. मित्रानो हेच प्रेम साफल्य आहे. प्रेमाची इति कर्तव्यता आहे,मॅडम आज प्रेम ह्या संकल्पनेला खरच उंची असते हे आम्हाला कळले. मित्रानो असे प्रेम कराल? विद्याथी आज एका वेगळ्याच आनंदात होते.

# TRUE LOVE PART 23

प्रेम साफल्य हे आपल्या प्रेमाला उच्च दर्जा प्राप्त करून देत नव्हे प्रेम साफल्य ही आपले प्रेम दिव्य व उदात्त आहे ह्याची खूण पटवून देतो,आपल्या प्रेमाची दिशा ही आशा उच्चतर तत्व शोधनाकडे वळविणे ह्यालाच प्रेम भक्ती म्हणतात,म्हणजे प्रेमाची परिसीमा भक्तीत आहे असे आपणास म्हणायचे आहे का?

नक्कीच,करण सर्वांभूती परमेश्वर हे जेव्हा मी स्वीकारले तेव्हाच माझ्या प्रेमाची दिशा मी परमेश्वराकडे वळविली आहे,मित्रानो प्रेम ही संकल्पना जोपर्यंत व्यक्तिनिष्ठ आहे वस्तुनिष्ठ आहे तोपर्यंत ती मर्यादित आनंद व अमर्यादित दुःख देते,पण हीच प्रेमाची दिशा सर्वांभूती चैतन्य तत्वाकडेवळविली की प्रेमाला मर्यादा राहत नाही ते अमर्याद तर होतेच पण अनुपमेय ठरते. मग तुम्हाला कशाची निवड करायची अमर्याद दुःख ची की अनुपमेय आनंदाची हे आता तुम्हाला ठरवायचे आहे.

मॅडम खर तर आम्ही जे प्रेम करतो ते खूप हिशेबी असत करण आम्हाला त्याच्यापासून काही फायदा मिळतो त्याच्यावरच आम्ही प्रेम करतो, आणि तो फायदा झाला तर ठीक नाहीतर आम्ही नातेसंबंध तोडायला सुद्धा मागेपुढे पाहत नाहीअगदी बरोबर आहे . पण अशा संबंधापासून आपल्याला दुःख मिळते, आपले प्रेम हे हिशेबी प्रेम आहे,आणि हिशेबात केलेल्या प्रेमात मग आपण गुलाम बनतो,गुलामी पत्करतो,मग असे प्रेमही लहरी बनते,आणि ह्या प्रेमातील मग रौनाकच निघून जाते,इच्छापूर्ती फायदा काही समाधान मिळविण्याची लालसा ह्या गोष्टी प्रेमात आल्या की ते प्रेम नाही वासना बनते.शुद्ध प्रेम जर तुम्हाला करायच असेल तर त्यातून लालसा व इच्छापूर्ती त्यातून वजा करावी लागेल. हेच प्रेमाचे गणित आहे. आणि

म्हणूनच नि:स्वार्थ प्रेम करता येणं ही मानवाची उत्क्रांतीच म्हणावी लागेल,आणि ह्यालाच अनुराग असेही म्हणतात,असे प्रेम स्वयंप्रेरीत असते. एकदा का असे निर्व्याज प्रेम आपल्याला करता आले की आपल्याला आपल्याच जीवनाचा विशाल अर्थ गावसतो आपण इतरांवर प्रेम करतो माझ्या प्रेमाची अभिव्यक्ती वेगवेगळी असते,मी आईवर प्रेम करतो,वडील बहीण भाऊ मित्र मैत्रिणी ह्या सर्वांवर प्रेम करण्याची आपली पद्धत निरनिराळी असते,पण मित्रानो ह्या सर्वांमध्ये आपले तादात्म्य असणे ही प्रेमाच्या व स्वीकासनाची गुरुकिल्ली आहे. ह्यात दृष्टिकोन तर विशाल बनतोच पण सर्वांभूती एक तत्व पाहण्याची आपली दृष्टी विकसित होते.

मॅडम हा मुद्दा आणखी थोडा विस्तृत करून सांगाधहे बघा मुलांनो आपण जेव्हा विवि सोन्याचे अलंकार वापरतो व त्यावर प्रेम करतो,,काही त्याला फक्त अलंकार बघतील पण ज्यांची दृष्टी विकसित झाली आहे ते कितीही अलंकार त्यांच्या समोर ठेवा ते फक्त त्यातील सोनेच बघतील. बरोबर न .मग मूल्य सोन्याचे की अलंकारांची ते ठरविण्याचा विवेक आपल्या ठिकाणी निर्माण होणे हे गरजेचं आहे,अलंकार जरी वेगळे असले तरी सुवर्ण तत्व महत्वाचेआणि हे पाहण्याची दृष्टी हे स्वीकासनाची खूण आहे,त्याच प्रमाणे व्यक्ती पशु पक्षी झाडे पाने फुले विविध तरी त्यातील चैतन्य तत्व एकाच जे माझ्यात आहे आणि ह्या दृष्टीने पाहिल्यास तत्वाच्या स्तरावर मग मी आणि विश्व ह्यात अद्वैत प्रस्थापित होते आणि मग आता मी इतरांवर प्रेम करतो की माझ्यावरच? आता प्रत्येक घटकात मी त्या चैतन्याचे अस्तित्व पाहत असेल तर ही माझी प्रेमाची सर्वोच्च अवस्था आहे,आणि अखिल विश्वावर अशी प्रेमाची फुले उधळणे ही सर्वोच्च पूजा आहे,विद्यार्थी खूपच स्तब्ध झाले होते, आजचा गृहपाठ होता की आशा वस्तू शोधा की वस्तु अनेक पण तत्व एकाच आहे.

# TRUE LOVE PART 24

मित्रानो प्रेमाचीसर्वोच्च अवस्था काय आहे हे एव्हाना तुमच्या लक्षात आले आहे,आपण सर्वशिक्षण घेतो पण शिक्षणाने आपण कुणाची ना कुणाची गुलामगिरी पत्करतोच,पण खरेप्रेम माणसाला गुलाम बनवत नाही,खऱ्या प्रेमात बऱ्याच अडचणी येतील कधीकशाचाही त्याग करावा लागेल आपल्या वाटेला अनेक दुःख येतील आणि प्रेमाचामार्ग जर इतका खडतर असेल तर मी प्रेमाचीच वाट का धरावी हा ही प्रश्न मनातउपस्थित होईल,तुमच्या बद्दल अनेक गैरसमज होतील हे गैरसमज कदाचित तुम्हालातुमच्या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतील,पण हीच तुमच्याप्रेमाची परीक्षा असेल,प्रेमावरची व प्रेमसपदावरील निष्ठेची परीक्षापाहण्याचे हेच क्षण असतील पण ह्याने घाबरून जाऊ नका,उलट प्रेमावरची निष्ठादृढ करा,प्रेमाच्या संदर्भात आपण एक लहान बालकप्रमाणे असायला हवे,लहानमूल चिडते ओरडते अगदी मारतो सुद्धा पण जेव्हा ते शांत होत तेव्हा पुन्हाआईच्या कुशीत विसावतो. प्रेमामध्ये सर्व प्रकारच्या त्रास सहन करा पणतुमचे प्रेम जराही कमी होऊ देऊ नका,,तुच्याकडून तुम्ही प्रेमभावनाचठेवा,हा जीवनविकास आहे हे ध्यानात ठेवा, कुणालाही आपल्याकडून दुःख झाले असेल तर मोठ्या मनाने माफी मागा आणि त्यांच्यावरही प्रेमाचा वर्षावकरा,ज्या क्षणी तुम्ही प्रेमाचा वर्षाव करता हा वर्षाव परमेश्वराकडे जातोहे नक्की समजा,आपल्या आयुष्यात बिकट प्रसंग येतात तेव्हा आशा वेळी थोरमंडळी काशी वागली ह्याचा अभ्यास करा, तुम्ही तुमच्या प्रेमाशी प्रामाणिकराहा,आजूबाजूचे लोक गप्प नाही बसणार पण तुम्ही मात्र

प्रेमाचा मार्ग सोडूनका. ज्याच्या मनात मानव जातीबद्दल खरे प्रेम आहे ज्याच्या मनातसहस्तित्वाची भावना प्रबळ आहे तोच खरा मानव,आणि अशी प्रेम करणाऱ्याव्यक्तींची जेव्हा एक फलटण तयार होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने हे जग विनाशपासून वाचेल. जगात शांतता निर्माण होईल मित्रानो ह्या प्रेमात देणेघेणे नाका ठेऊ. गैरसमज नका ठेऊ,एकदा प्रेम केलाय न मग सर्व प्रकारचीस्वीकृती ठेवा,प्रेमातील चांगले क्षण जसे भगवंताने पाठविले तसेच वाईटहीक्षण त्यानेच पाठविले,दोन्हीही रूपात त्याचीच कृपा बरसते आहे,आणि आपलेप्रेम भक्तीच्या उंचीवर नेऊन पोहोचवा.मॅडम **I LOVE YOU** ह्या शब्दाचीव्याप्ती किती व्यापक आहे,ही तर मोजताच येत नाही,आणि आम्ही ह्या शब्दालाकिती संकुचित बनविले,तुम्ही जेव्हा आम्हाला **I LOVE YOU** म्हणालात तेव्हाआम्ही खूप दचकलो होतो पण आज आम्हीही तुमच्यासाठी **I LOVE YOU** हा शब्द वापरूशकतोविद्यार्थ्यांचे हे शब्द ऐकून मला खूपच गहिवरून आले, खरच सर्वांना म्हणा,**I LOVE YOU** खूप व्यापक आहे हा शब्द, उद्याचा आपला **true love** चे शेवटचे विवेचन असेल, प्रत्येक भागात प्रेमाची कल्पना काशी विकसित झालीह्याचा अभ्यास करा



# TRUE LOVE PART 25

**TRUE LOVE ह्या विषयावरआपण २४ भागांमध्ये विवेचन पाहिले आजच्या भागात आपण ही संकल्पना प्रत्येकभागात कशी विकसित होत गेली ते पाहणार आहोत, I LOVE YOU ते I LOVE YOU हा प्रवास आपण केला(१)पहिल्या भागात आपण प्रेमाचे बीभत्स रूप जे आज आपण पाहतोत्याचे विवेचन पाहिले,,(२)दुसर्या भागात आपण पाहिले की मला इतरांचे प्रेममिळविण्यासाठी खूप इंप्रेस करावे लागते,पण ह्या भागात गुरुदेवांनी एकमहत्वाचा संदेश दिला** ’ don’t fall in love but rise in love, **प्रेमाचा पाया हाकेवळ शरीर आकर्षण नको (३)आपल्यापासून प्रेम दूर जाईल हे प्रेमाबाबत जे जेतिन्ही काळात भय असते त्यावर उपाय म्हणजे प्रेमच आहे। (४) आपण ज्यांच्यावरमनापासून प्रेम करतो त्यांच्याशी आपले वैचारिक तादात्म्य हवे,प्रेमातएकरूपता असावी लागते(५)प्रेम आणि स्नेह ह्या दोन प्रेमाच्या अभिव्यक्तीआहेत उच्च कोटींचा स्नेह म्हणजे प्रेम आणि बाह्य प्रेम म्हणजे स्नेह (६)स्नेहमध्ये आपण गुलामगिरी पत्करतो पण प्रेम मात्र मुक्त असते, (७) प्रेमातकुणी माझ्यावर प्रेम करण्या पेक्षा मी कुणावर प्रेम करतो हे महत्वाचेआहे,मग ह्यात स्पर्धा न राहता केवळ आनंद राहील (८)** don’t be the bigger of love be the donar of love **(९) परमेश्वरा समोरच्या व्यक्तीचे प्रेम मलामिळो की न मिळो पण मला मात्र सर्वांवर प्रेम करण्याची क्षमता दे(१०) आपणज्यांच्यावर प्रेम करतो त्यांच्याबाबत मनात गैरसमज निर्माण होऊ देऊ नकाप्रेमाचे गुण संवर्धन करा (११)** do the best and leave the rest to the God, **प्रेमाचे पाहिले मूलतत्त्व म्हणजे प्रिय**

व्यक्तीच्या प्रेमावरची आस्था वकळकळ (१२) जेथे प्रेम आहे तेथे कष्ट आहेत आणि जेथे दोन्हीही आहे तेथे आनंदआहे (१३)प्रेमाचे दुसरे मूलतत्त्व म्हणजे आपल्या प्रिय व्यक्तीच्याप्रेमाबद्दल ची आपल्या मनात उमटलेली प्रतिक्रिया म्हणजे प्रेम म्हणजे देणे (१४) प्रेमाचे तिसरे तत्व म्हणजे प्रियजनावरच्या प्रेमाचा आदर व पूज्यबुद्धीव ह्या तीनही तत्वांचा एकमेकांशी सहसंबंध आहे,,(१५) आदर प्रेम ह्यांचासमन्वय म्हणजे दिव्य प्रेम म्हणजेच मन आणि बुद्धीचा समन्वय प्रेमातअसावा (१६) शुद्ध प्रेम करण्याचे साधन म्हणजे प्रेमाची जाण,, प्रेमासपदाशीतादात्म्य,,सूक्ष्म व्यक्तिमत्वावर प्रेम म्हणजेच आत्मिक स्तरावरील ऐक्य ,,(१७) सर्व चराचरात एकाच चैतन्य आहे ही प्रेमात अनुभूती येते त्यामुळेसर्व भेदाभेद मिटतो,,प्रेम ही कला आहे ती संपादन करावी लागते,व ह्याकलेसाठी मनाची शिस्त एकाग्रता व समर्पणाची भावना असावी लागते (१८)आपल्यामनात प्रेम निर्माण व्हायचे असेल तर आपली तयारी हवी व मनात दुरविचारनको,स्वार्थ गर्व लालसा ह्याचा त्याग करावा लागेल (१९)प्रेम ही कला आहेतिच्या कडे छंद म्हणून बघू नाका तर प्रेमाचीच छंद लागावा व ते जीवनध्येयबनावे,प्रेम कला वृद्धीनगत होण्यासाठी तीन गुण म्हणजे मनाची एकाग्रता मनाचीशिस्त व प्रेमाला वाहून घेण्याची वृत्ती(२०) प्रेम करताना अनेकदा चूक होईलपण कोणतीही कला चुकल्याशिवाय येत नाही,व्यक्तीच्या गुणांवर प्रेम करावयासहवे(२१)प्रेम साफल्य म्हणजे समोरच्या व्यक्तीने माझ्या प्रेमास होकार देणेह्यात नाही तर सर्वांभूती एकाच चैतन्य आहे ही भावना प्रेम साफल्य म्हणजेप्रेम देणे,,(२२)वैश्विक दृष्टिकोन निर्माण होऊन विकसित होणे ही प्रेमभावनेची चराम सीमा आहे,,नामरूपात्मक भिन्नता असली तरी सर्वांना प्रकाशितकरणारे तत्व एकाच आहे आणि ते मी

आहे(२३)आपल्याला एकदा प्रेमाची मूलतत्त्वेकळली ,कला आत्मसात झाली की आपल्या प्रेमाची दिशा उच्च तत्वाच्याशोधण्यासाठी वळवायला हवी,,ह्यालाच भक्ती म्हणतात,,प्रेमाची परिसीमा भक्तीतआहे(२४)आपल्या प्रेमाच्या वर्षावाची दिशा ही परमेश्वराकडे असावी चैतन्यतत्वाच्या आकलनासाठी असावी,,(२५)मित्रानो सुरवातीला मी तुम्हाला I LOVE YOU म्हणाले तेव्हा तुम्ही किती दचकला,,पण आज तुम्हालाच कळतंय की I LOVE YOU हा किती उदात्त शब्द आहे,,खरच आईला वडिलांना गुरूंना राष्ट्राला मित्रांनापुस्तकांना हो तुमचा राग करतात त्यांनाही पशु पक्षी वृक्ष अगदी सर्वांना म्हणा I LOVE YOU मी सुद्धा तुम्हा सर्वांना म्हणते होय माझे तुमच्यासर्वांवर खूप खूप प्रेम आहे. ही सर्व प्रेमपुष्प आपण प,पू गुरुदेव स्वामी चिन्मयनानंद ह्याचे चरणी अर्पण करू या.

# I LOVE ALL OF YOU,

# I LOVE YOU ,

# I LOVE YOU.





# प.पू. गुरुदेव चिन्मयानंद ह्यांच्या परमपवित्र चरणावर लेखन सेवा अर्पण

डॉ. वसुधा विनोद देव